| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक २३९ वा | शुक्रवार दिनांक ०५ डिसेंबर, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹
RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### अवैध मद्य विरोधी कारवाई

लोहारा(प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत दगडु स रा.विलासपुर पांढरी ता. लोहारा जि. धाराशिव हे दि.०३.११.२०२५ रोजी १८.१० वा. सु. लोहारा ते विलासपुर पांढरी जाणारे रोडवरील बसस्थानकच्या बाजूस अंदाजे १,३०० किंमतीच्या २६ देशी विदेशी दारुच्या सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये लोहारा पो ठाणे येथे गुन्हे नोंदविला आहे.

### तुळजापूरातून कारची चोरी

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी जलील रहेमान शेख, वय ५२ वर्षे, रा. शुक्रवार पेठ ता.तुळजापूर जि. धाराशिव यांची अंदाजे १,००,००० किंमतीची मारुती सुझुकी इको कार ही दि.०२.१२.२०२५ रोजी बोंबले हनुमान चौक शुक्रवार पेठ तुळजापूर येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-जलील शेख यांनी दि.०३.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.


### म्हैस व वासराची चोरी

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी ललीता दत्तु गावडे, वय ६० वर्षे, रा. लोहगाव ता.तुळजापूर जि. धाराशिव यांची ५१,००० किंमतीची एक म्हैस व वासरु हे दि.२९.११.२०२५ रोजी लोहगाव शिवारातील शेत गट नं ७१ मधून अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-ललीता गावडे यांनी दि.०३.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### पाठीमागून धडक : महिला गंभीर जखमी होवून मृत्यु

तामलवाडी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत मयत सिंधुबाई मधुकर गाडे, वय ५५ वर्षे, रा. नांदुरी ता. तुळजापूर जि. धाराशिव दि.०२.१२.२०२५ रोजी हॉटेल शंभुराजे समोरील रोडवरुन नांदुरी येथुन पायी जात होत्या. दरम्यान बस क्र एमएच ४० एन ९६७२ चा चालक गणेश रा. एसटी आगार तुळजापूर ता. तुळजापूर जि. धाराशिव यानी त्याचे ताब्यातील बस ही हायगयी व निष्काळजीपणे चालवून सिंधुबाई गाडे यांना पाठीमागून धडक दिली. या अपघातात सिंधुबाई गाडे या गंभीर जखमी होवून मयत झाल्या. फिर्यादी नामे-प्रशांत मधुकर गाडे, वय ३५ वर्षे, रा.नांदुरी ता.तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.०३.१२.२०२५ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तामलवाडी पो ठाणे येथे भा.न्या.सं. कलम १०६(१) सह १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## रब्बी हंगाम २०२५ पिकस्पर्धा जाहीर : ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस पिकांसाठी शेतकऱ्यांना मोठी संधी



धाराशिव (जिमाका)- राज्यात शेतकऱ्यांकडून उत्पादन क्षमतेत वाढ करण्यासाठी विविध प्रयोगशील पद्धती अवलंबल्या जातात.शेतकऱ्यांच्या अशा नवनवीन प्रयोगांना प्रोत्साहन देणे,त्यांच्या मनोबलात वाढ करणे आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर अधिक जोमाने व्हावा,यासाठी राज्यात पिकस्पर्धा योजना राबविली जाते.या उपक्रमामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ होण्यास मदत होते, तसेच त्यांचा अनुभव इतर शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शक ठरतो.त्यामुळे राज्याच्या एकूण कृषी उत्पादनात मोलाची भर पडते.

**पिकस्पर्धा-२०२०** दि.२० जुलै २०२३ अन्वये रब्बी हंगाम २०२५ साठीही मागील वर्षाप्रमाणे तालुका,जिल्हा व राज्य पातळीवर पिकस्पर्धा राबविण्यात येणार आहे.कृषी विभागामार्फत रब्बी हंगाम २०२४ मध्ये ज्वारी,गहू,हरभरा,करडई व जवस या पाच पिकांसाठी स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे.

स्पर्धेतील पिके : ज्वारी,गहू,हरभरा करडई,जवस (एकूण ५ पिके)

**पात्रता निकष :** शेतकऱ्याकडे स्वतः च्या नावावर जमीन असणे आणि ती तो स्वतः कसत असणे आवश्यक आहे. शेतकऱ्याला एकापेक्षा जास्त पिकांसाठी स्पर्धेत सहभागी होता येईल.स्पर्धेत सहभागी होणाऱ्या पिकाखाली किमान ४० आर सलग लागवड क्षेत्र असणे आवश्यक.

**अर्जासाठी आवश्यक कागदपत्रे :**

विहित नमुन्यातील अर्ज (प्रपत्र-अ),

प्रवेश शुल्क भरल्याचे चलन,७/१२ व ८-अ उतारे,जात प्रमाणपत्र (आदिवासी गटासाठी),घोषित क्षेत्राचा चिन्हांकित नकाशा.अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख ही ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस : ३१ डिसेंबर २०२५ आहे.

तालुका,जिल्हा आणि राज्य पातळीवर पीकनिहाय विजेते प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकानुसार निवडले जातील.प्रवेश शुल्क हे सर्वसाधारण गट - ३०० रुपये, आदिवासी गट - १५० रुपये आहे.बक्षिसे (सर्वसाधारण व आदिवासी गट).तालुकास्तर, जिल्हास्तर व राज्यस्तरावरील पिक स्पर्धा निकाल प्रथम ,द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पीक स्पर्धा विजेते निवडण्यात येतील.

**राज्य पातळी :** पहिले ५०,००० रुपये,दुसरे ४०,००० रुपये,तिसरे ३०,००० हजार रुपये,जिल्हा पातळी पहिले : १०,००० रुपये,दुसरे ७,००० रुपये आणि तिसरे ५,००० रुपये.तालुका पातळी पहिले : ५,००० रुपये,दुसरे ३,००० रुपये आणि तिसरे २,००० रुपये असे सर्वसाधारण व आदिवासी गट बक्षिसे देण्यात येतील. शेतकऱ्यांनी या स्पर्धेत उत्साहाने सहभागी व्हावे,आपल्या क्षेत्रात व उत्पादनात वाढ करून राज्याच्या कृषी विकासात योगदान द्यावे,असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे.अधिक माहितीसाठी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी व तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा तसेच www.krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी.

## पुरुष नसबंदी पंधरवाडा : कुटुंब नियोजनात पुरुषांच्या सहभागाला चालना

धाराशिव, (जिमाका)- कुटुंब नियोजन हे केंद्र शासनाचे अत्यंत महत्त्वाचे धोरण असून,त्याची जबाबदारी बहुधा महिलांवरच पडते. समाजात असलेल्या गैरसमज आणि भीतीमुळे पुरुष कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेला पुढे येत नाहीत.या पार्श्वभूमीवर पुरुषांच्या सहभागात वाढ व्हावी,पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया आणि निरोध वापराला चालना मिळावी,यासाठी २१ नोव्हेंबर ते ४ डिसेंबर २०२५ या कालावधीत जिल्ह्यात पुरुष नसबंदी पंधरवाडा साजरा केला जात आहे.

या विशेष पंधरवाड्याचे उद्दिष्ट पुरुष नसबंदीविषयी जागरूकता वाढविणे, पुरुषांसोबत समुपदेशन करून कुटुंब नियोजनातील त्यांची समान जबाबदारी पटवून देणे,तसेच समाजातील गैरसमज दूर करणे हे आहे.स्वस्थ व आनंदी कुटुंबाचे स्वप्न, पुरुषांच्या सहभागातूनच साकार हे यावर्षीच्या मोहिमेचे घोषवाक्य आहे.

पंधरवाडा दोन टप्प्यात राबविण्यात येत आहे.

पहिला टप्पा (२१ ते २७ नोव्हेंबर)

संपर्क आठवडा. यामध्ये आशा व आरोग्य सेविका यांनी सर्वेक्षण करून योग्य जोडप्यांच्या याद्या तयार केल्या असून पुरुषांना नसबंदी शस्त्रक्रियेसाठी प्रवृत्त केले जात आहे.

दुसरा टप्पा (२८ नोव्हेंबर ते ४ डिसेंबर)

सेवाकालावधी. या काळात प्राथमिक आरोग्य केंद्रे व ग्रामीण रुग्णालयांमध्ये शस्त्रक्रिया कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे.सर्व शासकीय आरोग्य संस्थांमध्ये पुरुष नसबंदीची गुणवत्ता पूर्ण व खात्रीशीर सेवा उपलब्ध आहे.

जिल्ह्यातील आरोग्य संस्थांमध्ये स्त्री व पुरुष दोन्ही शस्त्रक्रिया उपलब्ध असून,याआधी नसबंदी केलेल्या लाभार्थ्यांमार्फतही जनजागृती आणि मोहिमेचा प्रसार करण्यात येणार आहे.यामुळे पुरुष नसबंदीचे प्रमाण वाढण्यास मदत होईल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

जिल्ह्यासाठी कुटुंब नियोजनाचे वार्षिक उद्दिष्ट ६१४० असून एप्रिल २०२५ ते ऑक्टोबर २०२५ या काळात एकूण ३२२९ शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.त्यापैकी ३२०२ महिला आणि फक्त ०९ पुरुष नसबंदी झाल्याने पुरुष सहभाग वाढविण्याची गरज अधोरेखित होते.

या मोहिमेचे यशस्वी आयोजन करण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतिश हरिदास यांनी आरोग्य विभागातील सर्व कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या असून,हा पंधरवाडा प्रभावीपणे राबविण्याचे आवाहन केले आहे.

## लोहारा तालुक्यात रस्त्यांची दयनीय अवस्था; अपघातांच्या प्रमाणात वाढ



लोहारा (प्रतिनिधी)- लोहारा तालुक्यातील रस्त्यांची अवस्था अत्यंत खराब झाली असून ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनचालकांना अक्षरशः कसरत करावी लागत आहे. आधीच उखडलेले रस्ते अतिवृष्टीमुळे अधिकच खराब झाले आहेत. अनेक ठिकाणी रस्त्यावरून पाणी वाहून गेल्यामुळे रस्ता आणि साईडपट्टी दोन्ही ठिकाणाहून खचले आहेत. त्यामुळे अनेक खड्डे मोठ्या खोलगटांमध्ये परिवर्तित झाले असून काही ठिकाणी वाहन चालवणेही अवघड झाले आहे.

खड्ड्यांमुळे दुचाकी, चारचाकी तसेच मोठ्या वाहनांनाही मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या खराब रस्त्यांमुळे अपघातांचे प्रमाण वाढले असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रविवारी सायंकाळी धानुरी येथील काही नागरिक लग्नासाठी पाटोदा येथे जात असताना लोहारा-पाटोदा रस्त्यावर असलेल्या खड्ड्यांमुळे त्यांच्या चारचाकी वाहनाचा अपघात झाला. सुदैवाने जीवितहानी टळली, मात्र रस्त्यांच्या स्थितीचे गांभीर्य यावरून स्पष्ट होते. अशा प्रकारचे अनेक अपघात तालुक्यात घडत असून नागरिकांचा संताप वाढत आहे.

वर्षानुवर्षे रस्त्यांची होणारी दुरवस्था, त्यावरचे अपुरे काम आणि पावसाळ्यात होणारे नुकसान पाहता नागरिकांनी प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून काम हाती घ्यावे, अशी मागणी केली आहे. लोहारा-माकणी-सास्तुर - नारंगवाडी या रस्त्याचे काम चालू आहे. भर पावसाळ्यात रस्ता ठेकेदाराने उखडून टाकल्याने या रस्त्यावर येजा करणारांना जीव मुठीत घेऊन तारेवरची कसरत करत प्रवास करावा लागला. सध्या डांबरी रस्ते उखडून खडक भरून समतोल रस्ता करण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे या रस्त्यावर वाहन जात असताना मोठ्या प्रमाणावर धुळ उडत असून वाहन चालकांना मोठे जिकिरीचे झाले आहे. दुचाकीस्वारांना मोठा धोका निर्माण झाला आहे. या रस्त्याचे काम त्वरीत करावे अन्यथा दररोज या रस्त्यावर पाणी टाकावे जेणेकरून धुळ उडणार नाही अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

लोहाऱ्यातील प्रमुख रस्त्यांसह ग्रामीण रस्त्यांची झाली चाळण लोहारा-पाटोदा मोड, लोहारा- धानुरी -तोरंबा -सालेगाव, लोहारा - मोघा-वाडीवडगाव-वडगाव - पाढरी(वि), सास्तूर -तावशी -सालेगाव, सास्तुर- कोंडजी, लोहारा-हिप्परगा -सलगरा, कास्ती-नागूर, लोहारा - कास्ती- भातागळी, -कानेगाव-आरणी, लोहारा -नागराळ -उंडरगाव यासह तालुक्यातील ग्रामीण रस्तेही खड्ड्यांच्या विळख्यात सापडले आहेत.

दुरुस्ती प्रस्ताव पाठवला लोहारा तालुक्यातील रस्ते खराब झाले आहेत. वार्षिक देखभाल दुरुस्ती प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे पाठवला आहे. प्राप्त होताच कार्यारंभ आदेश घेऊन दुरुस्तीचे काम चालू करण्यात येईल. - संतोष घोडके, उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, लोहारा.

डांबरीवर खडकाचा मुलामा लोहारा- पाटोदा रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाने संबंधित गुत्तेदाराला खड्डे बुजवून घेण्यास सांगितले होते. परंतू गुत्तेदाराने डांबरी रस्त्यावरील खड्डे हे खडी व डांबराने रुजवणे आवश्यक होते. परंतू संबंधीत गुत्तेदाराने डांबरी रस्त्याला मुरुमाचा मुलामा देत खडकाने खड्डे बुजवले. परिणामी मुरमाचे खडे रस्त्यावर आल्याने दुचाकी घसरून अपघात झाले.

## गावठाण जमिनीच्या ताब्याच्या कारणावरुन मारहाण

येरमाळा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, बिभीषण शेकाबा ढोणे, शशिकला बिभीषण ढोणे, उषा बाळू येलकर, बाळु सोपान येलकर, निवृत्ती बाळु येलकर, गणेश मिठ्ठु ढोणे, अमोल बिभिषण ढोणे सर्व रा. कडकनाथवाडी ता. वाशी जि. धाराशिव यांनी दि.०१.१२.२०२५ रोजी गावठाण जमिन कडकनाथवाडी शिवार येथे फिर्यादी नामे-पुष्पा भगवान येलकर, वय ४० वर्षे, रा.कडकनाथवाडी ता. वाशी जि. धाराशिव यांना नमुदांनी गावठाण जमिनीच्या ताब्याच्या कारणावरुन गैरकायद्याची मंडळी जमवून शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, काठी व दगडाने मारहाण करुन जखमी केले.फिर्यादीचे पती सोडवत असताना त्यांनाही शिवगाळ करुन मारहाण केली. जिवे ठार मारण्याच धमकी दिली.

अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-पुष्पा येलकर यांनी दि.०३.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे येरमाळा येथे भा.न्या.सं.कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२),(३), १८९(२), १९१(२) (३), १९० अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पालिस अधिक तपास करीत आहेत.

### भाडंणाचे कारणावरुन मारहाण

कळंब (प्रतिनिधी)-पोलीस ठाणे अंतर्गत आकाश यांनी कसबा गल्ली कळंब ता. कळंब दि.०३.१२.२०२५ रोजी १७.०० वा. सु. कसबा गल्ली सुतार नेट कळंब येथे फिर्यादी अनिकेत अविनाश पांचाळ, वय कसबा गल्ली कळंब ता. कळंबे यांना नमुद आकाशनेमागील भाडंणाचे कारणावरुन शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, चाकुने मारहाण करुन जखमी केले. जिवे ठार मारण्याच धमकी दिली.

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सन २०२६ मधील स्पर्धा परीक्षांचे अंदाजित वेळापत्रक जाहीर

धाराशिव (जिमाका)-: महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सन २०२६ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षांचे अंदाजित वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून ते आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळांवर उपलब्ध करून देण्यात आले आहे. शासनाच्या मागणीनुसार शासन सेवेमधील विविध पदांसाठी भरती प्रक्रिया पार पाडण्यासाठी आयोगामार्फत वर्षभर विविध स्पर्धा परीक्षांचे आयोजन केले जाते. यानुसार सन २०२६ मध्ये होणाऱ्या सर्व परीक्षांचे दिनांक निश्चित करण्यात आले आहेत.

वेळापत्रक निश्चित करताना संघ लोकसेवा आयोग,विविध विद्यापीठे तसेच इतर परीक्षा घेणाऱ्या संस्थांच्या परीक्षांचे वेळापत्रक विचारात घेण्यात आले आहे.यामुळे कोणत्याही परीक्षा एकाच दिवशी होऊन उमेदवारांचे नुकसान होणार नाही,याची विशेष दक्षता घेण्यात आली आहे.प्रस्तावित वेळापत्रकाची प्रत सर्व संबंधित संस्थांना पाठविण्यात आली असून आवश्यक ती दक्षता घेण्याची विनंती करण्यात आली आहे.

उमेदवारांना आयोगामार्फत आयोजित सर्व परीक्षांमध्ये उमेदवारांना जास्तीत जास्त संधी उपलब्ध व्हावी यासाठी हे वेळापत्रक व कार्यक्रम सर्व कार्यालयांनी आपल्या सूचना फलकावर प्रसिद्ध करावेत,असे आवाहन महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अवर सचिवांनी केले आहे.

## कळंब बस आगारात प्रवासी राजा दिन व कामगार पालक दिन अडीअडचणी सोडूवुन साजरा !




कळंब (प्रतिनिधी)- येथील बस स्थानक व आगार येथे दि . ३ रोजी राज्य परिवहन महामंडळाचे धाराशिव विभागाचे विभाग नियंत्रक अजय पाटील यांच्या अध्यक्षतेखाली प्रवासी राजा दिन व कामगार पालक दिन आयोजित करण्यात आला होता या प्रवासी राजा दिनानिमित्त प्रवासी मित्र संघटनेचे प्रा . मोहन जाधव यांनी विविध विषयावर विभाग नियंत्रक अजय पाटील यांच्यासमोर समस्या मांडल्या यात प्रामुख्याने खिळा खिळा झालेल्या बसेस ,बस स्थानकावर उठणारा धुरळा ,स्वच्छता त्याचप्रमाणे वाहक ,चालक यांच्या विश्रांती कक्षाच्या समस्येबाबत सौचालयाबाबत व स्थानकात दोन वाहतूक नियंत्रक त्याचबरोबर, स्वच्छतेबाबत बस स्थानकावरील लाईट ,सीसीटीव्ही कॅमेरे ,प्रवाशांची सुरक्षा अशा अनेक मुद्द्यावर सखोल चर्चा होऊन त्यात काही मुद्देही निकाली काढण्यात आले तात्काळ अंमलबजावणी करून प्रवाशांच्या दृष्टीने सर्व सुख सुविधा उपलब्ध करून द्याव्यात असे आदेशही आगारप्रमुखांना याच वेळी देण्यात आले .

यावेळी कामगार संघटनेमार्फत विभाग नियंत्रक अजय पाटील यांचा सत्कार करण्यात आला याप्रसंगी महेश थोरबोले, शिवाजी बांगर ,गणेश गोरे , प्रवासी मित्र संघटनेचे प्रा . मोहन जाधव ,प्रभाकर झांबरे ,प्रभारी आगारप्रमुख बालाजी भारती आदी उपस्थित होते .

## १९६ कारवाया करुन १,५१,७०० 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)-शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.०३ डिसेंबर रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण १९६ कारवाया करुन १,५१,७०० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## आरोग्यास घातक असणाऱ्या वस्तूचे दर वाढविले पाहिजेत

देश म्हणजे देशातील नागरिक तेही मजबुत असली पाहिजेत. आरोग्याने सदृढ असली पाहिजेत. त्यापेक्षाही देशातील भावी पिढी ही बलशाली बनली पाहिजे. हा दृष्टिकोन शासनकर्त्याच्या डोळयासमोर ठेवला पाहिजे. देश म्हणजे दगड-धोंडे नाहीत तर देश म्हणजे देशातील सदृढ जनता हा दृष्टिकोन असला पाहिजे. त्यानुसार विचार केला पाहिजे. त्यामुळे मोदी सरकारने एक चांगला निर्णय घेतला असावा. दिल्लीतील हिवाळी अधिवेशनात लोकसभेने सेंट्रल एक्साइज (अमेंडमेंट) बिल, २०२५ मंजूर केले आहे, आता हा प्रस्ताव राज्यसभेकडे जाईल. तंबाखू आणि त्यावर आधारित उत्पादने जसे की, सिगरेट, जर्दा, सिगार, हुक्का तंबाखू यावर अधिक कर लावण्याचा मार्ग या बिलातून मोकळा होणार आहे. पण सरकारने अचानक हे बिल का आणले आहे? हा मोठा प्रश्न आहे. जीएसटी लागू करताना तंबाखू उत्पादांवर अतिरिक्त 'कंपेंसेशन सेस' लावण्यात आला होता. राज्यांचा महसुली तोटा भरून काढण्यासाठी हा सेस तात्पुरता ठेवण्यात आला होता. आता तो कालावधी संपत आल्यामुळे हा सेस आपोआप बंद होईल. सरकारला वाटते की जर हा सेस काढून टाकला, तर तंबाखू उत्पादने स्वस्त होतील आणि त्याचा वापर वाढेल. म्हणूनच केंद्राने नवीन विधेयक आणत एक्साइज ड्युटी वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. कर वाढला की वापर कमी होतो. भारतात तंबाखू उत्पादने 'सिन गुड्स' म्हणून पाहिली जातात. आरोग्याला धोका निर्माण करणाऱ्या वस्तूंच्या वापरावर आळा घालण्यासाठी कर वाढवला जातो. ही पद्धत जगभरात आहे. भारतात सिगरेटवर सध्या २८ टक्के जीएसटीसोबत अतिरिक्त सेस आकारला जातो. हा सेस काढून टाकत सरकार नवीन एक्साइज ड्युटी लावणार आहे. त्यामुळे सरकारचे महसूली उत्पन्न वाढेल आणि मिळणारा निधी आरोग्य सेवा व राष्ट्रीय सुरक्षेसारख्या क्षेत्रांत वापरण्याचा विचार आहे. या नव्या कररचनेचा सर्वाधिक परिणाम सिगरेट आणि तंबाखूवर होणार आहे. कच्च्या तंबाखूवर ६० ते ७० टक्के तर हुक्का तंबाखूवर ४० टक्क्यांपर्यंत शुल्क आकारले जाण्याची शक्यता आहे. जर्दा, पान मसाला, सिगार यांवरही नवीन ड्युटी किंवा सेस लावण्यात येणार आहे. लोकसभेतील चर्चेदरम्यान शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळेंनी याला पाठिंबा दिला. धूम्रपानावर नियंत्रण आणण्याचा हेतू योग्य असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र तंबाखू शेतीवर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांचे काय, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. सरकारने यावर उत्तर देताना शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र योजना तयार केली जाईल, असे सांगितले. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी विरोधकांच्या काही शंकांना उत्तर देताना सांगितले की, हा कर 'सेस' नसून 'उत्पादन शुल्क' आहे आणि तो केंद्र-राज्य वाटणीमध्ये येणार आहे. भारतातील सिगरेटवरील करभार सध्या किंमतीच्या ५३ टक्क्यांपर्यंत आहे, तर जागतिक आरोग्य संघटना यासाठी ७५ टक्के करभाराची शिफारस करते. ऑस्ट्रेलिया आणि ब्रिटनसारख्या देशांत हा दर ८०-८५ टक्क्यांपर्यंत आहे. आपल्याकडे सिगरेट स्वस्त होणार नाही, अशी थेट भूमिका सीतारामन यांनी जाहीरपणे मांडली. लोकसभेत बिल मंजूर झाल्यानंतर आता राज्यसभेची वेळ आहे. कर वाढीमुळे तंबाखू उत्पादने महागणार हे स्पष्ट आहे, तर दुसरीकडे छोटे व्यापारी आणि तंबाखू उत्पादक शेतकरी चिंताग्रस्त आहेत. मात्र केंद्र सरकारचा दावा आहे की लोकांच्या आरोग्याची काळजी घेत सिन गुड्सवर नियंत्रण आणणे ही काळाची गरज आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे देशातील नागरिकांचे आरोग्य हे सृढस असले पाहिजे यासाठीच लक्ष दिले पाहिजे. सध्या देशात मधुमेहाचे रुग्णाची वाढती संख्या चिंतनीय आहे. कर्करोगाचे रुग्ण वाढत आहेत. त्याच प्रमाणे सिगारेट व दारूच्या व्यसनात आडकलेले लिव्हरच्या आजारात आडकले जात आहेत. लिव्हर असा शरिरातील भाग आहे तो बदलणे अशक्य आहे. त्यामुळे मद्य किंवा नशेचे पदार्थ हे घातक आहेत, यावर बंदी आणू शकत नाही. यापासून मोठ्या प्रमाणात महसुल मिळतो. मुळात महसुल मिळतो म्हणून अयोग्य घातक बाबीवर बंदी आणली पाहिजे. बंदी आणणे अशक्य असल्याने की काय आता यावर अधिक कर आकारला जाणार आहेत. त्याचे दर वाढीव असणार आहेत हे योग्य पाऊल आहे. मुळात नशीले पदार्थ मग मद्य असोत की, तंबाखुजन्य उत्पादीत पदार्थ असतो त्यावर कडक निर्बंधाची गरज आहे. काही झाले तरी जे देशातील जनतेच्या आरोग्यास घातक आहे त्याचा वापर बंद केला पाहिजे. त्याच प्रमाणे देशातील काही राज्यात मद्यावर बंदी आहे. जसे गुजरात किंवा बिहार या राज्यातील जनता आनंदी आहे. मद्य मिळाले नाही म्हणून जीव सोडले नाहीत. सध्याला रांगा व शिस्तबद्ध असे दारूच्या दुकानात दिसते. त्यामुळे विचार केला तर मोदी सरकार एक चांगला निर्णय घेत आहे. मद्य किंवा गुटखा बंद केली पाहिजे. यापासून मोठ्या प्रमाणात कर्करोग होत आहेत हे मान्य केले जाते. त्यामुळे बंद करणे आवघड असल्याने की, काय भरमसाठ आता कर आकारण्याचा विचार असू शकतो. याला पाठींबा दिला पाहिजे. या बाबत एक बाब एका सदस्यांनी व्यक्त केली. तंबाखुची शेती बंद केली तर शेतकऱ्याचे काय होईल? मुळात शेतकरी विविध उत्पादने आपल्या शेतात घेत आला आहे. मग गांजाची शेतीस परवानगी मागीतल तर? असा विषय समोर येणार आहे. त्यामुळे जे देशातील जनतेसाठी घातक आहे. त्यावर निर्बंध आणले पाहिजेत. मुळात आपल्या देशात अधिक महसुली उत्पादन मिळते म्हणून घातक बाबीकडे दुर्लक्ष करू नये. त्याच प्रमाणे देशात हाळू-हाळू देशातील नागरिकांच्या आरोग्यास हानी पोंहचेल असे उत्पादने बंद करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. व्यसनामुळे अनेकांच घरदार उद्धस्थ झाले आहेत. व्ससन कोणतेही का असत नाही ते वाईट आहे. त्यामुळे जनता वाईट व्यसनात आडकू नयेत याची खबरदारी सरकारने घेतली पाहिजे. धुम्रपान हे घातक आहे हे समजुन ही त्याचा वापर होतो. त्यामुळे सक्तीने विविध मार्गाने निर्बंध आणणे काळाची गरज आहे.

# चला माती परिक्षण करुया, आपली जमीन समृद्ध करुया



जागतिक माती दिन अर्थात जागतिक मृदा दिन दरवर्षी ५ डिसेंबर रोजी साजरा केला जातो. मातीचे संवर्धन, सुपिकता तिच्या महत्त्वाविषयी जागरूकता निर्माण व्हावी, हा या दिवासाचा उद्देश आहे. जगण्यासाठी म ूलभूत गरज असलेल्या अन्नाची आवश्यता आहे, ती मातीतून पिकणाऱ्या अन्न धान्यामुळे पूर्ण होते. जमिनीमधील मातीचे परिक्षण करुन योग्य पद्धतीने उत्पादन घेतले तर पिकांचे उत्पादन वाढेल. शेतातील माती निरोगी असेल तर समृद्ध शेती होईल. त्यासाठी मातीचे परिक्षण करुन समृद्धता वाढविण्यावर भर दिला जात आहे. त्यामुळे तुम्ही जर शेतकरी आहात, तुमच्याकडे जमीन आहे तर तुम्ही माती परीक्षण केले पाहिजे. चल, आपली माती आणि तीची गुणवत्ता जाणून घेऊ या!ष्ठ.

मातीचे महत्त्व

अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजा मातीशिवाय पूर्ण होवू शकत नाहीत. माती विना शेती शक्य नाही त्यामुळे निरोगी माती ही समृद्ध शेतीसाठी अत्यंत आवश्क आहे. मानवाने विज्ञान व तंत्रज्ञानातून कितीही प्रगती साधली, तरी एकदा नष्ट झालेली माती पुन्हा निर्माण करता येत नाही, हे वास्तव आहे. १० सेंटीमीटर मातीचा थर तयार होण्यासाठी हजारो वर्षे लागतात त्यामुळे मातीचे महत्त्व पर्यावरण आणि सजीवांच्या दृष्टीने अनन्यसाधारण आहे.

माती संवर्धन- काळाची गरज

आरोग्यदायक माती हा आरोग्यदायी अन्न निर्मितीचा पाया आहे. पृथ्वीचा एक चतुर्थांश भाग विविध जीवांनी व्यापला असून ही जैवविविधता टिकवून ठेवण्यात मातीचा मोलाचा वाटा आहे. मातीमध्ये पाणी साठविण्याची आणि ते शुद्ध करण्याची क्षमता आहे, तसेच पूर व दुष्काळासारख्या संकटालाही मातीमुळे मात मिळते. विविध वनस्पतींच्या लागवडीसाठी किंवा अन्न, वस्त्र (कापूस, ताग सारखे विविध धागे) इंधन आणि औषधी वनस्पतींच्या व्यवस्थेसाठी माती मूलाधार आहे. मातीतील विविध घटक कर्बचक्रात महत्त्वाची भूमिका बजावतात. वातावरणातील बदल सहन करणे आणि तो सौम्य करणे यासाठी माती सहाय्यभूत ठरते. जल व्यवस्थापन आणि पूर व दुष्काळ या आपत्तींना तोंड देऊन परिस्थिती पूर्वपदावर आणण्यातही मातीतील विविध घटक महत्त्वाची भूमिका बजावतात. अन्न सुरक्षा आणि शाश्वत भवितव्य मातीवरच अवलंबून असल्याने मातीचे संरक्षण, शाश्वत संवर्धन काळाची गरज आहे.

माती संवर्धन उपाय

माती संवर्धनासंदर्भातील उपाययोजनांसाठी महाराष्ट्र शासनाचा कृषी विभाग २० नोव्हेंबर ते ५ डिसेंबर २०२५ दरम्यान मातीचे नमुने गोळा करण्याबाबत पंधरवडा मोहिम राबवित आहे. यानुसार राज्यातील १० लाख ८० हजार शेतकऱ्यांच्या मातीचे परिक्षण करुन जमीन आरोग्य पत्रिका वितरण करण्याचे निश्चित केले आहे. तसेच जिल्हा, तालुका, गावस्तरावर शेतकऱ्यांना जमीन आरोग्य पत्रिका वितरीत करुन जमिनीच्या आरोग्य विषयषक, माती परिक्षणाचे महत्त्व, जमीन सुपीकता निर्देशांक व जमीन आरोग्य पत्रिका आधारित खतांच्या संतुलित वापराविषयी, एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, सेंद्रीय खत वापराचे फायदे याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

कृषी विभाग, जिल्हा परिषद, आत्मा यंत्रणा, कृषी विद्यापीठ, संशोधन संस्था, कृषी विज्ञान केंद्र, नोंदणीकृत खासगी प्रयोग शाळा, कृषी विषयक संस्था इत्यादींच्या सहयोगाने जिल्ह्यांमध्ये ५ डिसेंबर रोजी मृद आरोग्याचे महत्त्व, सॉईल हेल्थ कार्ड, मोबाईल ॲपद्वारे मृद नमुने तपासणी केल्यावर जमीन आरोग्य पत्रिका आधारीत खतांचा संतुलित वापर याबाबत चर्चासत्रे, व्याख्याने कार्यक्रम यांचे आयोजन करण्यात आले आहे.

माती परीक्षणाचे फायदे

माती संवर्धनासाठी माती परीक्षण करुन घेऊन त्यानुसार उपयोजना केल्यास त्या फायदेशीर ठरतात त्यामुळे जमिनीतील उपलब्ध घटकांचे प्रमाण समजते. त्यावर आधारीत पिकांच्या गरजेप्रमाणे आवश्यक तेवढेच खत दिल्यामुळे आर्थिक बचत होते. जमिनीच्या प्रतीनुसार पिकांची निवड व नियोजन करता येते. खतांचा संतुलित वापर केल्यामुळे पिकांची वाढ चांगली होऊन अधिक उत्पादन मिळते. जमिनीची सुपिकता आजमावता येते. जमिनीतीत काही दोष असतील तर ते देखील समजतात आणि दोषानुसार जमीन सुधारण्यासाठी नियोजनबद्ध उपाययोजना करण्यात येतात.

माती परीक्षण कसे करावे

शेतकऱ्यांनी कागदावर लिहून तो कागद माती नमुन्याच्या पिशवीत टाकावा.

१) माती नमुना क्रमांक
२) माती नमुना घेतल्याची तारीख
३) शेतकऱ्याचे संपूर्ण नाव
४) मोबाईल क्रमांक
५) गावपोस्ट
६) तालुका
७) जिल्हा
८) सव्हे गट क्रमांक
९) नमुन्याचे प्रातिनिधी क्षेत्र
१०) जमीन प्रकार बागायत जिरायत
११) मागील हंगामातील पीक जात
१२) पुढील हंगामातील पीक जात
१३) मातीची खोली सें.मी.
१४) जमीनीचा उतार
१५) जमीनीची काही विशेष लक्षणे-खारवट, चोपण,आम्ल व इतर
१६) पाण्याचा निचरा बरा वाईट
१७) माती गोळा करणाऱ्याची स्वाक्षरी घेवून मातीचे नमुने संबंधित गावातील कृषी सहायक कृषी पर्यवेक्षक मंडल कृषी अधिकारी यांच्यामार्फत किंवा शेतकत्यांनी स्वत: जिल्हा मृद चाचणी प्रयोग शाळेकडे वरील प्रमाणे माहिती भरुन पाठवावा.

मातीचा नमुना केव्हा व कोठे घ्यावा ?

मातीचा नमूना पिके काढल्यानंतर किंवा पेरणीपूर्वी (सेंद्रीय व रासायनिक खते देण्यापूर्वी) व खते दिल्यानंतर तीन महिन्यांनी घ्यावा. मातीचा रंग, जमिनीचा खडकाळपणा, उंच- सखलपणा, पिकातील फरक व बागायत जिरायत स्थिती लक्षात घेऊन त्याप्रमाणे शेतीचे वेगवेगळे भाग पाडावेत व त्या प्रत्येक भागाला विशिष्ट क्रमांक द्यावेत. प्रत्येक भागाचा वेगळा नमूना घेण्यात यावा.

खालील ठिकाणांहून मातीचे नमूने घेऊ नयेत

गुरे बसण्याची व झाडाखालची जागा, खते व कचरा टाकण्याची जागा, दलदल व घराजवळची जागा, पाण्याच्या पाटाजवळील जागा, बांधाजवळचे क्षेत्र, झाडाझुडाचे क्षेत्र याठिकाणचे माती नमूने टाळावेत.

जमीन सुधारणा करण्यासाठी आवश्यक उपाययोजना

जमिनीचा चोपणपणा वाढत आहे. त्यासाठी उतारास समांतर चर काढून पाण्याचा निचरा होईल अशी काळजी घ्यावी. हेक्टरी ५ ते १० टन जिप्सम पूड व १५ ते २५ गाड्या चांगले कुजलेले खेणखत जमिनीत मिसळून घालवे. हिरवळीच्या खतासाठी ताग, धैंचा, शेवरी सारखी पिके घेऊन फुलावर येताच जमिनीत गाडावीत. भात, कापूस, गहू, शेवरी यासारखी पिके घ्यावीत. जमीनीच्या पृष्ठावर आलेले क्षार खरवडून शेताबाहेर टाकून द्यावे. जमिनीचे लहान वाफे करुन त्यात थोडा वेळ वाफा भरुन पाणी साठवून एकदम चरावाटे बाहेर काढून टाकावे, म्हणजे पाण्याबरोबर क्षार बाहेर जातील. सेंद्रीय खतांचा भरपूर प्रमाणात वापर करावा.क्षारास दाद देणारी पिके कांदा, भात, कापूस, सूर्यफुल, शेवरी सारखी पिके घ्यावीत. क्षार संवेदनशिल पिकांची लागवड करु नये,पिकांची लागण सरीच्या कुशीत करावी. क्षारास दाद देणारी पिके घ्यावीत व पिकांची नियमीत फेरपालट करावी. जास्त प्रमाणात सेंद्रीय व हिरवळीची खते वापरावीत.पिकास योग्य वेळी थोडे थोडे पाणी द्यावे. पाण्याच्या अतिवापरामुळे क्षारांचे प्रमाण वाढल्यास माती परिक्षणानुसार जिप्समची मात्रा ठरवून त्याचा वापर करावा. चांगल्या व मचुळ पाण्याचा एकत्रित वापर करावा.

वरील पद्धतींचा अवलंब करुन आपल्या शेतीचे आणि शेतीतील मातीचे योग्य परीक्षण झाले पाहिजे. शेत जमिनीत खतांचा, पाण्याचा योग्य वापर, जमिनीला आवश्यक असणाऱ्या पिक पद्धतीचा वापर करुन शेतीची सुपिकता मातीची समृद्धता टिकवून उत्पादन वाढीसाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे.

# रोजगार क्षमतेत वाढ करण्यासाठी शिक्षण - उद्योग क्षेत्र एकत्र

## मुक्त विद्यापीठाची निमा लघुउद्योग भारती सोबत बैठक



**नाशिक/प्रतिनिधी :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील यश इन सभागृहात शिक्षण व उद्योग क्षेत्र समन्वय उपक्रम अंतर्गत निमा (नाशिक इंडस्ट्रीयल मॅन्युफॅक्चरर असोसिएशन) व लघु उद्योग भारती यांच्यासोबत मुक्त विद्यापीठाची संयुक्त बैठक संपन्न झाली. रोजगारक्षमतेत वाढ करण्यासाठी ज्ञान आणि उद्योग यांना एकत्र जोडणे हा या उपक्रमाचा व बैठकीचा उद्देश होता. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे होते. व्यासपीठावर निमाचे अध्यक्ष श्री. आशिष नहार, विद्यापीठ प्र कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, विद्यापीठ व्यवस्थापन मंडळ सदस्य प्रा. डॉ. डी. एम. गुजराथी, विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे संचालक प्रा. सुरेंद्र पाटोळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

अध्यक्षस्थानावरून बोलतांना विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे म्हणाले की शिक्षण क्षेत्रातून उद्योग क्षेत्रात मनुष्यबळ जात असते. मात्र ते काहीसे कच्च्या स्वरूपातील असते. आत्मनिर्भर भारत बनवण्यासाठी, सन २०४७ पर्यंत विकसित भारत करण्यासाठी शिक्षण व उद्योग क्षेत्राने एकमेकांची शक्तिस्थाने व गरजा ओळखणे महत्वाचे आहे. विद्यापीठाचे पाठयक्रम आधारित शिक्षणक्रम व उद्योगक्षेत्रातील प्रत्यक्ष कामकाज आधारित प्रात्यक्षिक यांची सांगड घालण्यासाठी, त्यांच्यातील कमतरता भरून काढण्यासाठी छोटे छोटे कॅप्सुल शिक्षणक्रम, हस्तपुस्तिका, लिंकसह प्रत्यक्ष कामकाजाचे व शैक्षणिक माहितीचे छोटे छोटे व्हिडीओज तयार करणे गरजेचे आहे. उद्योग व्यवसायातील अद्ययावतीकरण व विकासासाठी विद्यापीठ या क्षेत्रात संशोधन व विकासासाठी एक दोन वर्षे अल्पमुदतीचे प्रकल्प सुरु करण्यासाठी सहकार्य करण्यास तयार आहे.

विद्यापीठातर्फे सुरु असलेले विविध रोजगाराभिमुख शिक्षणक्रम, उपक्रम यांची माहिती त्यांनी दिली. नाशिकसह देशाच्या विकासासाठी शिक्षण व उद्योग क्षेत्रासह आपण सर्वांनी एकत्र काम करुया असे आवाहन मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी आपल्या भाषणाच्या शेवटी केले.

निमाचे संचालक श्री. आशिष नहार यांनी नकारात्मकता झटकून सकारात्मकतेने आता काम सुरु असल्याचे उदाहरणांसह सांगितले. नाशिकचा कुंभमेळा हा विकासाचा देखील मेळा ठरणार आहे. त्यासाठी सर्वांनी एकेमेकांच्या खांद्याला खांदा लावून एकत्रित काम करण्याची गरज आहे. उद्योग क्षेत्राला अनेक शिक्षणक्रमांची व त्यातील प्रशिक्षित मनुष्यबळाची गरजा आहे. त्यासाठी शिक्षण व उद्योग क्षेत्रातील मान्यवरांनी एकत्रित येवून एक समिती बनवून त्या समितीने शिक्षण प्रशिक्षणातून विकासाचा एक रोडमॅप बनवावा अशी सुचना त्यांनी मांडली.

लघुउद्योग भारती, नाशिकचे संचालक श्री. निखील तापडिया यांनी मुक्त विद्यापीठ व निमाच्या उपक्रमात संपूर्णपणे सक्रिय सहभागी होण्याचे आश्वासन दिले. सिन्नर सहकारी ओद्योगिक वसाहतीचे श्री. नामकरण आवारे यांनी उपलब्ध असलेला रोजगार व त्यासाठी आवश्यक असलेला कामगार यातील दरी विसंगती दूर करण्यासाठी आजची ही बैठक उपयुक्त ठरणार असल्याचे सांगितले.

यावेळी निमाचे संचालक सर्वश्री संजय राठी, गोविंद बोरसे, नानासाहेब देवरे, मिलिंद राजपूत, प्रकाश गुंजाळ, लघुउद्योग भारतीचे संचालक श्री. योगेश जोशी, स्टार्टअप इंडियाचे नाशिक येथील मार्गदर्शक श्री. श्रीकांत पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना उपयुक्त सूचना मांडल्या.

बैठकीत संयुक्त चर्चा - सहकार्याच्या संधी या विषयांतर्गत उद्योगाच्या गरजेनुसार शिक्षणक्रम विकास, ऑन-जॉब ट्रेनिंग, आवश्यक ते सामंजस्य करार, कंपन्यांसाठी तत्काळ मनुष्यबळाची उपलब्धता, त्यासाठी सल्लागार समिती व संयुक्त प्रकल्प यांसारख्या विविध मुद्द्यांवर सकारात्मक चर्चा झाली. यावेळी निमा, लघुउद्योग भारतीचे विविध संचालक, पदाधिकारी, विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक व आभारप्रदर्शन प्रा. सुरेंद्र पाटोळे यांनी केले. श्री. स्नेहल म्हापणकर यांनी सूत्रसंचलन केले.

# मुले अजिबातच जेवत नाहीत, पौष्टिक खाणे टाळतात? 'हा' आयुर्वेदिक उपाय वाढवेल भूक



आजकाल मुलांना खायला घालणे हे एका टास्कपेक्षा कमी नाही. बहुतेक मुले अन्न पाहताच तोंड फिरवतात. मुलांच्या या वागण्याने नाराज झालेले पालक त्यांना तासन् तास समजावतात, प्रेमाने त्यांना कमीत कमी एक किंवा दोन चमचे खाण्यासाठी सांगतात. त्याच वेळी, काही मुले खाण्याऐवजी पॅकेज्ड नूडल्स आणि पास्ता खाण्याचा आग्रह धरतात.

असे पॅकेज्ड अन्न मुलांच्या आरोग्यासाठी हानिकारक ठरतात. अन्न न खाल्ल्याने मुलांमध्ये शारीरिक कमजोरी दिसून येते. इतकेच नाही तर कमी किंवा अजिबात अन्न नसल्याने मुलांच्या शरीरात पोषक तत्वांचा अभाव असतो, ज्यामुळे त्यांचा शारीरिक आणि मानसिक विकास नीट होत नाही.

अनेकदा असे दिसून येते की जेव्हा पालक मुलांना जबरदस्तीने अन्न खायला देतात तेव्हा त्यांना उलट्या होऊ लागतात. अशा मुलांसाठी, तज्ज्ञांनीं एक खास रेसिपी शेअर केली आहे. त्यांनी लहान मुलांची भूक कशी वाढवता येईल हे सांगितले आहे..

मुलांची भूक वाढवण्यासाठी आयुर्वेदिक उपाय-

मुलांची भूक वाढवण्यासाठी तुम्हाला एक हिरडा घ्यावा लागेल.

हिरडा पाण्यात बारीक केल्यानंतर त्यात थोडी हिंग घाला.

तयार झाल्यावर, तुम्हाला दररोज १/४ चमचा मुलांना खायला द्यावे लागेल.

तज्ञ म्हणतात की तुम्ही हिरडा आणि हिंगचे मिश्रण १० महिने ते २ वर्षांच्या मुलांना देऊ शकता.

हिरडा खाण्याचे फायदे-

तज्ञांच्या मते, हरडमध्ये व्हिटॅमिन सी, मॅग्नेशियम, पोटॅशियम, लोह आणि तांबे यासारखे अँटीऑक्सिडंट्स आढळतात. हिरडाचे नियमित सेवन केल्याने पचनसंस्था सुधारण्यास मदत होते. त्याचे सेवन केल्याने गॅस, पोटदुखी, जळजळ आणि अपचन यापासून आराम मिळतो. त्याच वेळी, हिंग खाल्ल्याने पचनाच्या समस्यांपासूनही आराम मिळतो. या दोन्ही गोष्टी एकत्र खाल्ल्याने भूक वाढण्यास मदत होते.

# कोणत्या पदार्थांमध्ये असते भरपूर 'व्हिटॅमिन ई' जाणून घ्या बेस्ट फूड ऑप्शन




त्वचा निरोगी ठेवण्यासाठी योग्य काळजीसोबतच पौष्टिक आहाराचीही आवश्यकता असते. जर आपल्या अन्नात सर्व पोषक तत्वे योग्य प्रमाणात नसतील तर आपली त्वचा निस्तेज आणि खराब होऊ शकते.

या आवश्यक पोषक तत्वांमध्ये, आपण अनेकदा व्हिटॅमिन ई समाविष्ट करायला विसरतो, जे आपल्या त्वचेच्या चमक आणि पोषणासाठी खूप महत्वाचे आहे. इतकेच नाही तर व्हिटॅमिन ई समृद्ध आहार घेतल्यास मुरुम आणि डागांपासूनही मुक्तता मिळू शकते. आज या लेखात, आम्ही तुम्हाला व्हिटॅमिन ई असलेल्या अन्नपदार्थांची यादी सांगणार आहोत, ज्यांचा आहारात समावेश केल्याने त्वचा निरोगी आणि चमकदार बनू शकते.

**पालक-**

हिरव्या भाज्या म्हणजेच पालक हे आरोग्यदायी फायद्यांनी परिपूर्ण आहे. दररोज याचे सेवन केल्याने शरीरात रक्ताची कमतरता होत नाही. पालकामध्ये व्हिटॅमिन ई व्यतिरिक्त, व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ए, लोह, कॅल्शियम आणि व्हिटॅमिन के सारखे अनेक पोषक घटक आढळतात. व्हिटॅमिन ईमुळे ते चेहऱ्यावरील बारीक रेषा कमी करण्यास मदत करते.

**बदाम-**

बदाम हे आरोग्याचा खजिना मानले जाते. त्यात निरोगी फॅट्स आढळते, जी त्वचेला कोरडेपणा आणि सुरकुत्या येण्यापासून वाचवते. एवढेच नाही तर बदामामध्ये अँटी-ऑक्सिडंट्स असल्याने ते तुमच्या शरीरातील फ्री रॅडिकल्सच्या नुकसानापासून तुमचे रक्षण करते. पोषणतज्ज्ञ म्हणतात की दररोज फक्त ४ ते ५ बदाम खाल्ल्याने शरीरावर हानिकारक सूर्यकिरणांमुळे होणाऱ्या समस्या देखील टाळता येतात.

**भुईमूग-**

शेंगदाणे त्वचेसाठी खूप फायदेशीर मानले जातात कारण त्यात व्हिटॅमिन ई भरपूर प्रमाणात असते. शेंगदाणे खाल्ल्याने त्वचेचे संक्रमण देखील टाळता येते. याशिवाय, ते त्वचेला कोरडे होण्यापासून देखील वाचवते. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की शेंगदाणे नियमितपणे खाल्ल्याने मुरुमे आणि डागांसारख्या समस्या उद्भवत नाहीत.

**ब्रोकोली-**

पोषणतज्ज्ञांच्या मते, ब्रोकोलीमध्ये पुरेशा प्रमाणात व्हिटॅमिन ई देखील आढळते. जे त्वचा चमकदार आणि निरोगी ठेवण्यास मदत करते. याशिवाय, ब्रोकोलीमध्ये झिंक आणि फायबर देखील भरपूर प्रमाणात असते, जे आतडे निरोगी ठेवण्यास आणि त्वचा चमकदार बनविण्यास मदत करते.

**एवोकॅडो-**

एवोकॅडोमध्ये व्हिटॅमिन ई असते. त्यात वृद्धत्वविरोधी गुणधर्म असतात. जे सुरकुत्या आणि बारीक रेषा रोखण्यास मदत करतात.

# संचार साथीॲप नेमके काय आहे ?

'संचार साथी' पोर्टलवर उपलब्ध असलेल्या सर्व सुविधा आता ॲपवर आल्याने नागरिकांना 'फ्रॉड रिपोर्ट' करणे आणि सेवा वापरणे अधिक सोपे झाले आहे. केंद्र सरकारच्या दळणवळण विभागाने स्मार्टफोनमध्ये प्री-इंस्टॉल करणे अनिवार्य केलेल्या 'संचार साथी' ॲपमुळे आता सामान्य नागरिकांना बर्याच सुविधा मिळणार आहेत.

हे ॲप स्मार्टफोनमध्ये प्री-इन्स्टॉल करून उपलब्ध करून देण्याच्या निर्णयावरून वादंग झाला. यावर विरोधकांनी आरोप करत सरकारला धारेवर धरले आणि हेरगिरी करायची आहे का, असा प्रश्न उपस्थित केला. वाद वाढल्याचे लक्षात येताच सरकारने स्पष्ट केले की, 'संचार साथी'फोनमधून डिलीट केले जाऊ शकते. यावर तज्ज्ञांचे नेमके काय मत आहे ? आणि संचार साथी विषयी सविस्तर जाणून घेऊया.

हे ॲप विशेषतः फसवणूक थांबवण्यासाठी आणि हरवलेले/चोरी झालेले मोबाईल फोन ब्लॉक करण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. पुढील काही दिवसांत हे जुन्या फोन्समध्ये ओटीए अपडेटद्वारे तर नवीन स्मार्टफोनमध्ये प्री-इंस्टॉल्ड अवस्थेत उपलब्ध होईल. या ॲपचे पाच प्रमुख फीचर्स आहेत :




तुमचा मोबाईल फोन चोरी झाल्यास किंवा हरवल्यास, तुम्ही 'संचार साथ' ॲपचा वापर करून तो त्वरित ब्लॉक करू शकता. यामुळे तुमच्या फोनचा गैरवापर होणार नाही. तसेच, जर तुम्हाला तुमचा फोन परत मिळाला, तर तुम्ही तो याच ॲपद्वारे अन-ब्लॉक देखील करू शकता.

बनावट कॉल्स आणि मेसेजची तक्रार

या ॲपमध्ये 'चक्षु' सर्विस उपलब्ध आहे. याचा वापर करून, वापरकर्त्यांना आलेल्या कोणत्याही संशयास्पद कॉल्स किंवा मेसेजेस (ते व्हॉट्स ॲप असोत किंवा साधे एसएमस याची तक्रार करता येते.

**किती नंबर ॲक्टिव्ह आहेत?**

'संचार साथी' ॲपचा सर्वांत महत्त्वाचा फीचर म्हणजे तुमच्या आधार कार्ड किंवा ओळखपत्रा-वर किती मोबाईल नंबर ॲक्टिव्ह आहेत, याची माहिती मिळते. जर तुमच्या नावाने कोणताही अनधिकृत नंबर सुरू असेल, तर तुम्ही त्वरित त्याची तक्रार करून तो नंबर बंद करू शकता.

बनावट हँडसेटची माहिती घ्या

तुमचा फोन बनावट आहे की, नाही हे तपासण्यासाठी 'संचार साथी' ॲप मदत करते. यामध्ये फक्त तुमच्या फोनचा १५ अंकी (एमईए) नंबर टाका. हे फीचर फोनचा ब्रँड, मॉडेल नंबर आणि निर्मितीची माहिती दाखवतो, ज्यामुळे तुम्ही बनावट फोन खरेदी करण्यापासून वाचू शकता.

**परदेशी कॉल्सची तक्रार**

जर तुम्हाला भारतीय मोबाईल नंबरवरून परदेशातून फोन आल्यास, त्याची तक्रार या ॲपद्वारे करता येते. यासाठी तुम्हाला कॉलचा नंबर, वेळ आणि देशासारखे तपशील देऊन तक्रार नोंदवावी लागते.

दूरसंचार विभागाच्या (डॉट) स्मार्टफोनमध्ये संचार साथी ॲप प्री-इन्स्टॉल करण्याच्या आदेशावरून वाद वाढल्यानंतर केंद्र सरकारने मंगळवारी परिस्थिती स्पष्ट केली. याबाबत केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी स्पष्ट केले आहे की, 'हे एक पर्यायी ॲप असेल आणि युजर्स ते फोनमधून डिलीट करू शकतील.' केंद्र सरकारने स्मार्टफोन कंपन्यांना त्यांच्या फोनमध्ये संचार साथी ॲप-इन्स्टॉल आणि विक्री करण्याचे आदेश दिले होते. यानंतर सर्व कंपन्या, टेक तज्ज्ञ आणि लोकांनी याबाबत नाराजी व्यक्त केली.

**हा होता सरकारचा निर्णय**

ॲपल, सॅमसंग, मोटोरोला, शाओमी, विवो आणि ओप्पो यांसारख्या स्मार्टफोन कंपन्यांना दूरसंचार विभागाने संचार साथी ॲप प्री-इन्स्टॉल करून त्यांचे फोन विकण्याचे आदेश दिले होते. असे करण्यात अयशस्वी झाल्यास या कंपन्यांवर दंड आकारला जाईल. या कंपन्यांना ९० दिवसांत आदेशाची अंमलबजावणी करण्यास आणि १२० दिवसांत दूरसंचार विभागाला अनुपालन अहवाल सादर करण्यास सांगण्यात आले. त्यानंतर सर्व ठिकाणांहून या निर्णयाविरोधात आवाज उमटू लागले. ईटी टेलिकॉमच्या रिपोर्टनुसार, हे ॲप उपयुक्त ठरेल, डेटा कोठे ठेवला जाईल आणि युजर्स तो डिलीट करू शकतील का, या आदेशाबद्दल टेक तज्ज्ञ चिंतेत होते. आता सरकारने हे स्पष्ट केले आहे की,'जर युजरला फोनमध्ये आधीपासून इन्स्टॉल केलेले हे ॲप वापरायचे नसेल तर ते फोनमधून डिलीट देखील करू शकतील.'

**सिम बाइंडिंगचे आदेशही देण्यात आले**

सरकारने संचार साथी ॲप मोबाईल फोनवर प्री-इन्स्टॉल करण्याचे आदेश दिले होते तसेच व्हॉट्सॲप आणि टेलिग्राम सारख्या मेसेजिंग ॲप्ससाठी सिम बाईंडिंग देखील दिले होते. याची अंमलबजावणी फेब्रुवारी २०२६ पासून होणार आहे. यानुसार आता युजर्स त्या नंबरचे सिम कार्ड फोनमध्ये ठेवल्याशिवाय मेसेजिंग ॲप्स चालवू शकणार नाही, ज्यामुळे ते मेसेजिंग ॲपवर खाते चालवत आहेत. अशा परिस्थितीत, फोनमधून सिम काढून टाकताच मेसेजिंग ॲप देखील काम करणे बंद करेल.

**तज्ज्ञ काय म्हणाले?**

आपल्या स्मार्टफोन 'कम्युनिकेशन कंपॅनियन ॲप' प्री-इन्स्टॉल करण्याच्या सरकारच्या निर्णयावर ॲपल इत्यादी अनेक स्मार्टफोन उत्पादक नाराज आहेत. या कंपन्यांचे म्हणणे आहे की, हे त्यांच्या जागतिक धोरणाच्या विरोधात आहे आणि विविध कंपन्या या निर्णयाविरोधात कायदेशीर मार्ग स्वीकारण्याचा विचार करत आहेत. त्याचप्रमाणे सिम बाईंडिंगच्या निर्णयावर ब्रॉडबँड इंडिया फोरमचे (इखऋ) अध्यक्ष टीव्ही रामचंद्रन म्हणतात की, सिम-बाइंडिंगमध्ये ऑपरेटिंग सिस्टमच्या पातळीवर तांत्रिक समस्या उद्भवतात आणि ते सर्व डिव्हाइसवर योग्यरीत्या कार्य करू शकत नाही.

ॲप डाऊनलोड करण्याचे प्रमाण दहापट

'संचार साथी' ॲप डाऊनलोड करण्यासाठी नागरिकांमध्ये उत्साह वाढल्याचे दिसून आले. डाऊनलोड करण्याचे प्रमाण मंगळवारी दहापट वाढले होते, अशी माहिती दूरसंचार विभागा (डॉट) च्या वतीने बुधवारी देण्यात आली. ॲप डाऊनलेड करण्याचे प्रमाण दिवसाला सुमारे ६० हजार ते सुमारे सहा लाखांच्या आसपास गेले आहे.

'संचार साथी' ॲपला विरोधी पक्षांनी जोरदार विरोध केला असला तरी नागरिकांमध्ये त्यामध्ये अधिक उत्सुकता अहे. नव्याने येणार्या मोबाइल संचात ते पूर्वीपासून असणे सरकारने बंधनकारक केले होते. नंतर हा निर्णय मागे घेतला. मात्र, उद्योग जगातील तज्ज्ञांनी ॲपच्या बंधनाच्या विषयाला विरोध केला होता. तज्ज्ञ आणि विरोधी पक्षांच्या नेत्यांनी विरोध केल्यानंरह त्याचे डाऊनलोड करण्याच्या प्रमाणात अचानक वाढ झाली आहे.

ॲप मोठ्या प्रमाणात डाऊनलोड ते करु लागले आहेत. दूरसंचार विभागाच्या मते एका दिवसांत त्याचे प्रमाण दहापट वाढले. दिवसभरात सरासरी ६० हजार ते सहा लाख असे आहे. या संदर्भातील माहिती दूरसंचार विभागातील सूत्रांनी दिली.

❐❐❐



# स्मरणशक्ती सुधारण्यासाठी नियमित करा ह्या खालील गोष्टी

मेंदूचे आरोग्य निरोगी होण्यासाठी तुमच्या आहारात भरपूर प्रमाणात टोमॅटोचे सेवन करणे गरजेचे असते. अनेकांमध्ये टोमॅटोची भाजी, सूप हे पदार्थ विशेष लोकप्रिय आहेत. तुमच्या मेंदूचे आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी टोमॅटोचं सेवन उपयुक्त ठरते. टोमॅटोमध्ये भरपूर प्रमाणात लायकोपिन नावाचे घटक असते. त्यामुळे तुम्ही हृदय निरोगी ठेवण्यासाठी टोमॅटोची कोशिंबीर, भाजी किंवा सूप या पदार्थांचा तुमच्या आहारात समावेश करू शकता.मेंदूचे आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी तुमच्या आहारामध्ये ड्राय फ्रूट्सचे सेवन करणे गरजेचे आहे. ड्राय फ्रूट्समध्ये भरपूर प्रमाणात हेल्दी फॅट आणि प्रोटिन असतात. दररोज सकाळी बदाम आणि आक्रोडचे सेवन केल्यास तुमच्या मेंदूचे आरोग्य निरोगी राहाण्यास मदत होते. ड्राय फ्रूट्समध्ये भरपूर प्रमाणात ओमेगा-३ ॲसिड आणि अँटिऑक्सिडंट असतात. त्यामुळे मेंदूचे आरोग्य निरोगी राहाण्यास मदत होते.चहा आणि कॉफीचे सेवन तुमच्या आरोग्य निरोगी राहाण्यास मदत होते. कॉफीचे सेवन करणे तुमच्या आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर ठरते. रिपोर्टनुसार, **(क्रमशः पुढील अंकात)**

# सार्वजनिक ठिकाणी रोमान्स ठरू शकतो कायदेशीर गुन्हा



मीनाक्षी जगदाळे

भारतात कारमध्ये, सार्वजनिक ठिकाणी किंवा जवळपास कुठेही पार्किंग करून सेक्स किंवा रोमांस करणे हे सहसा भारतीय दंड संहिता (आयपीसी) च्या कलम २९४ अंतर्गत 'अश्लील कृत्य' म्हणून पाहिले जाऊ शकते. या कलमानुसार, जर सार्वजनिक ठिकाणी कोणतेही अश्लील कृत्य केले ज्यामुळे इतरांना त्रास होतो, तर तो दंडनीय अपराध असू शकतो, ज्यासाठी कारावास किंवा दंड किंवा दोन्हीची शिक्षा होऊ शकतात.

कोणत्याही जोडप्याने रस्त्यात, कारमध्ये, कुठल्याही सार्वजनिक ठिकाणी भावनेच्या भरात मर्यादा ओलांडून रोमान्स करणे, लोकांच्या मनात लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करणे हा अतिशय महत्त्वाचा आणि संवेदनशील विषय आहे. रिलेशनशिपमध्ये असताना, प्रेम प्रकरण असताना जोडप्याने एकमेकांच्या जवळ येणे, प्रेम व्यक्त करणे किंवा शारीरिक संबंध ठेवणे, हे त्यांच्या व्यक्तिगत आयुष्याचा आणि निवडीचा भाग आहे. मात्र, जेव्हा ही कृती सार्वजनिक ठिकाणी केली जाते, तेव्हा त्याचे गंभीर कायदेशीर आणि सामाजिक परिणाम होतात. आजकाल आधुनिकतेच्या, फॅशनच्या नावाखाली आपण सर्रास सर्वच मर्यादा ओलांडू लागलो आहोत. विशेषत: शालेय महाविद्यालयात जाणारे विद्यार्थी, गर्लफ्रेंड, बॉयफ्रेंड अथवा विवाहबाह्य संबंध असलेले स्त्री-पुरुष अनेकदा कुठल्याही निसर्गरम्य ठिकाणी आडोसा शोधून, सुनसान ठिकाणी अथवा अनोळखी जागेवर, निर्जनस्थळी, कारमध्ये, कॅफेमध्ये, जॉगिंग ट्रॅक, बागबगीचे, मैदाने या ठिकाणी स्वतः चे देहभान आणि आजूबाजूला कोण आहे, परिस्थिती काय आहे, आपण कुठे आहोत हे विसरून एकमेकांना नको तिथे शारीरिक स्पर्श करणे, रोमान्स करणे, शारीरिक संबंध ठेवणे या गोष्टी करताना दिसतात. आजमितीला असे करणे एक प्रकारची फँटसी आहे म्हणून, कुठे इतर ठिकाणी सहजासहजी जागा उपलब्ध नाही म्हणून अथवा त्यासाठी पैसे खर्च करायची तयारी अथवा तेवढी कुवत नाही म्हणून सुद्धा अनेकजण कुठे न कुठे सार्वजनिक ठिकाणी आपल्या प्रेमाला वाट मोकळी करून देताना दिसतात. हे करत असताना या कृत्यांची कायदेशीर बाजू काय आहे हे कितीजण लक्षात घेतात किंवा किती लोकांना याबद्दल माहिती आहे? यावर विचार झाला पाहिजे असे वाटते.

भारतात कारमध्ये, सार्वजनिक ठिकाणी किंवा जवळपास कुठेही पार्किंग करून सेक्स किंवा रोमांस करणे हे सहसा भारतीय दंड संहिता (खझउ)च्या कलम २९४ अंतर्गत 'अश्लील कृत्य (जलीलशपश -लीं)' म्हणून पाहिले जाऊ शकते. या कलमानुसार, जर सार्वजनिक ठिकाणी कोणतेही 'अश्लील कृत्य' केले ज्यामुळे इतरांना त्रास (-पपूेरपलश) होतो, तर तो दंडनीय अपराध असू शकतो, ज्यासाठी कारावास किंवा दंड किंवा दोन्हीची शिक्षा होऊ शकतात. 'सार्वजनिक ठिकाणी' आणि 'अश्लील कृत्या' ची व्याख्या प्रत्येक प्रकरणात, स्थानिक सामाजिक नैतिकता आणि न्यायालयाच्या निर्णयानुसार बदलू शकते. कार जरी तुमची खासगी जागा असली, तरी ती सार्वजनिक ठिकाणी पार्क केलेली असल्यास आणि त्यातील कृत्य बाहेरून दिसणारे, जाणवणारे, समजणारे असल्यास किंवा इतरांना त्रासदायक ठरल्यास, पोलीस कारवाई करू शकतात. अशा अविचारी कृती करताना त्याचे काय परिणाम होऊ शकतात हे लक्षात घेणे आवश्यक आहे. पोलिसांनी पकडल्यास, तुमच्यावर खझउ कलम २९४ अंतर्गत गुन्हा दाखल होऊ शकतो. याच्या नोंदीमुळे तुमच्या भविष्यातील नोकरी किंवा पासपोर्ट पडताळणीवर परिणाम होऊ शकतो. पोलिसांकडून चौकशी आणि कायदेशीर प्रक्रियांचा सामना करावा लागू शकतो. महत्त्वाचे म्हणजे यामुळे त्या अवस्थेत पकडल्या गेलेल्या महिलेला सगळ्यांसमोर अपमानित व्हावे लागते. जवळपास, त्या ठिकाणी चुकीच्या प्रवृत्तीचे लोक असल्यास तुम्हाला ब्लॅकमेल करून तुमच्याकडे पैशांची मागणी केली जावू शकते. शाळा, कॉलेजच्या मुली अनेकदा गणवेशात असताना पर्यटन स्थळ, समुद्र किनारा, पब्लिक व्हेकल या ठिकाणी आपल्या मित्रांसोबत पाहायला मिळतात. अशा मुलींनी हे भान ठेवणे आवश्यक आहे की आपण अशा वागणुकीतून किती मोठ्या धोक्याला आमंत्रण देत आहोत.

## डॉक्टर टीप्स

डाएटकट्टा । कमी खाण्यापेक्षा कमी वेळा खाल्ल्याने आजारांवर मात । डॉ. दीक्षित



### वैवाहिक जीवन सुधारण्यासाठी विशेष टिप्स

६. आपल्या दोघांमधील नात घट्ट करण्यासाठी एकमेकांसोबत वेळ घालवून बोलण गरजेच आहे. यामुळे तुम्ही तुमची वैवाहीक जीवन चांगले एन्जॉय करू शकता आणि तुमचा पार्टनर तुमच्या जवळ येण्यास मदत होईल. ७. चांगल्या वैवाहीक जीवनासाठी तुमचे आरोग्य चांगल असणे महत्वाचे आहे, आणि त्यासाठी चांगले भोजन, व्यायाम आणि झोप घेणे गरजेचे आहे.या काही वैवाहीक टिप्स मुळे तुम्ही तुमची लाइफ खूप चांगली प्रकारे जगू शकता तसेच तुमच्या मध्ये असलेले मतभेद सुद्धा दूर होण्यास मदत होऊल.




## विनोद

छोटी सुमन बाबांना विचारते, 'बाबा लोणचे फार महाग असते का?' बाबा म्हणतात, 'नाही, पण तू का विचारतेस?' सुमन रडत रडत म्हणते, 'सकाळी माझ्या हातून थोडसे लोणचे तुमच्या नव्या सद्र्यावर सांडले तर आई केवढे ओरडली.'

## संदेश

Tujse dosti karne ka hisab na aya,
mere kisi bhi sawal ka jawab na aya,
hum to jagte rahe tere hi khayalo me,
aur tujhe so kar bhi hamara khawab na aya

## सुविचार

परमेश्वर तरल आहे, परंतु विद्वेषपूर्ण नाही.

**अल्बर्ट आइनस्टाइन**




### संस्कृत सुभाषित

**विद्या नसे ज्या तप दान नाही । न ज्या गुण ज्ञान न शील काही ।। न धर्म भूमिप्रति भारकारी । पशूच ते मानव देहधारी ।।**

**अर्थ** -त्याग, श्रीगुरुंची कृपा, सत्यवाणी, शौर्य, अंत:करणाची निश्चलता व निरोगीपणा अशा गुणांची येथे प्रशंसा केली आहे.

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. शहिदांचे दिल्ली येथील स्मारक '------ ज्योती'
६. निर्णय
९. समुद्रकिनारा
१२. हिंदीत पशू
१४. डुक्कर
१५. गायीचे पिल्लू
१६. मुरुमाची जमीन
१८. रमापती
२०. खराब झालेला आंबा
२१. व्यक्ती, मनुष्य
२३. अनुयायी, पायदळातील शिपाई
२५. स्वामी
२६. समुद्र
२७. जास्तीत जास्त व कमीत कमी
२९. चालविणारा अवयव
३०. दारूचा एक प्रकार
३२. मलई
३३. दिवस
३४. मध
३६. सर्वस्व
३७. गाय
३८. खाली मान घातलेला
४०. रत्न
४२. श्रीविष्णुचे बटुरूप
४६. होडी
४७. आई
४८. वरपांगी, दिखाऊ
४९. मीठाची चव
५०. तीव्र ऊन
५२. भूतकाळ
५४. वाळवंट
५५. लक्ष्मीचे एक नाव
५७. नूतन
६०. षष्ठीची देवता
६२. वृक्ष
६३. वर्ष, साल
६५. अखेर
६७. उद्यानंतरचा दिवस
६९. वचक
७०. क्रिकेटच्या खेळातील सहा धावांचा फटका
७२. दाणे वगैरे कुटण्याचे पूर्वीचे साधन
७४. वाईट, नासके
७६. मकर
७७. नवा जोम, चपळता
८०. हात
८१. माळेत हे ओवतात
८२. माती नसलेली जमीन

### उभे शब्द

१. अव्यस्थित राहणारा
२. अंत:करण
३. गोव्यातील शिवशंभो
४. सोन्याचा वस्त्रातील धागा
५. शहर
६. प्रतिनिधी निवडण्याची क्रिया
७. तुरूंग
८. लाट, हुक्की
१०. एक शेंगभाजी
११. आवड, रूची
१२. तारूण्य
१६. ठेकेदार
१७. आईचा भाऊ
१९. नवरदेवाची आई
२२. संतोष, आनंद
२४. गुणज्ञ
२५. चित्रपटाचा हिरो
२८. शेतकरी
२९. गरीब, क्षुल्लक
३०. दात
३१. जन्म-मृत्यू
३३. पृथ्वीभोवतीचे हवेचे आवरण
३५. रंगवलेले
३९. पुरुषांचे नेसण्याचे हे वस्त्र आता कालबाह्य होत चाललेय
४०. प्रजा
४१. खास, विशेष हकीगत
४२. शेतजमीन
४३. गोदाम
४४. पदार्थ शिजतानाचा आवाज
४७. पत्ता
५१. रड्या माणूस
५३. कर्ण
५६. खवा
५८. 'दारु' मोजण्याने बदनाम झालेले माप
५९. गाडीचे छत
६०. प्रश्न
६१. मुस्लिमांचा एक सण
६४. नट्टापट्टा
६६. बंगाली रुपया
६८. शुष्कता
७१. सुंदर तरुणी
७३. फणसाचा एक प्रकार
७४. गाढव
७५. बगळा
७८. रमणीय, मनोहारी
७९. पद्धत

### आडवे उत्तर

१.अमर जवान ६.निकाल
९.सागरतट १२.जानवर
१४.वराह १५.वासरू १६.मुरमाड
१८.रमावर २०.नासका २१.माणूस
२३.पाईक २५.नाथ २६.दर्या
२७.कमाल किमान २९.पाय
३०.रम ३२.साय ३३.वासर
३४.मकरंद ३६.तनमनधन
३७.गो ३८.अधोवदन ४०.रतन
४२.वामनावतार ४६.तर ४७.माय
४८.वरवर ४९.खारट ५०.रणरण
५२.गतकाल ५४.रण ५५.रमा
५७.नविन ६०.सटवाई ६२.तरू
६३.सन ६५.शेवट ६७.परवा
६९.दरारा ७०.षटकार ७२.खलबत्ता
७४.खराब ७६.मगर ७७.तरतरी
८०.कर ८१.मणी ८२.खडकाळ

### उभे उत्तर

१.अजागळ २.मन ३.रवळनाथ ४.जर
५.नगर ६.निवडणूक ७.कारा ८.लहर
१०.गवार ११.रस १२.तरूणाई
१६.मुकादम १७.मामा १९.वरमाय
२२.समाधान २४.कदरदान २५.नायक
२८.किसान २९.पामर ३०.रद ३१.जनन मरण ३३.वातावरण ३५.रंगीत ३९.धोतर
४०.रयत ४१.नवलविशेष ४२.वावर
४३.वखार ४४.तार ४५.रटरट ४७.मागमूस
५१.रडतराऊत ५३.कान ५६.मावा
५८.नवटाक ५९.टप ६०.सवाल ६१.ईद
६४.नखरा ६६.टका ६८.रखरख ७१.रमणी
७३.बरका ७४.खर ७५.बक ७८.रम्य
७९.रीत



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### टीम इंडियाने ३५८ धावांचा डोंगर उभारला, तरीही पराभव का झाला?

मुंबई -भारत आणि दक्षिण आफ्रिका या दोन्ही संघांमध्ये सुरू असलेल्या ३ वनडे सामन्यांच्या मालिकेतील दुसरा वनडे सामना रायपूरमध्ये पार पडला. मालिकेतील पहिल्या सामन्यात भारतीय संघाने १७ धावांनी विजय मिळवला होता. मालिकेतील दुसऱ्या सामन्यातही भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेसमोर विजयासाठी ३५९ धावांचे मोठे आव्हान ठेवले होते. मात्र, दक्षिण आफ्रिकेने शेवटच्या षटकात हे आव्हान यशस्वीरित्या पूर्ण केलं आणि दमदार विजयाची नोंद केली. यासह मालिका १-१ ने बरोबरीत आणली. दरम्यान इतकं मोठे आव्हाने देऊनही भारतीय संघाचा पराभव कसा झाला? काय आहे पराभवाचं नेमकं कारण? जाणून घ्या.भारतीय संघाची दमदार सुरूवात

या सामन्यातही दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे भारतीय संघाला पुन्हा एकदा पहिल्या डावात फलंदाजीसाठी याव लागले. पहिल्या डावात फलंदाजी करताना रोहित शर्मा आणि यशस्वी जैस्वालची जोडी स्वस्तात माघारी परतली. त्यानंतर विराट कोहली आणि ऋतुराज गायकवाड यांनी मिळून भारतीय संघाचा डाव सांभाळला.

### दक्षिण आफ्रिकेच्या टी - २० मालिकेसाठी भारताचा संघ जाहीर

नवी दिल्ली-दक्षिण आफ्रिकेच्या टी-२० मालिकेसाठी आता भारताचा संघ जाहीर करण्यात आला आहे. कर्णधार सूर्यकुमार यादवच्या खांद्यावर संघाची धुरा असणार आहे. टी-२० विश्वचषक २०२६ च्या दृष्टीने ही पाच सामन्यांची मालिका महत्त्वाची असणार आहे.

सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली भारताच्या संघाने एकाही मालिकेत हार पत्करलेली नाही. सूर्याच्या नेतृत्वाखाली भारताने दमदार कामगिरी केली आहे. आता भारतापुढे दक्षिण आफ्रिकेचे आव्हान असणार आहे. या टी-२० मालिकेसाठी भारताने आपला संघ जाहीर केला आहे. भारतीय संघाने आतापर्यंत टी-२० मालिकेत दमदार कामगिरी केली आहे. त्यामुळे आता दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेत भारतीय संघ कशी कामगिरी करतो, याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असणार आहे. दोन्ही संघांमधील एकदिवसीय मालिका संपल्यानंतर ९ डिसेंबरपासून कटकमध्ये टी-२० मालिकेला सुरूवात होईल. तर अखेरचा सामना १९ डिसेंबरला अहमदाबादमध्ये खेळवला जाईल.

### आयपीएल २०२६ च्या मिनी लिलावात हे ५ अष्टपैलू खेळाडू ठरणार मोठे दावेदार

दिल्ली-इंडियन प्रीमियर लीगचा १९ वा हंगाम २०२६ मध्ये होणार असून, काहीच आठवड्यांत याबाबत मिनी ऑक्शन आयोजित केले जाणार आहे. सर्व फ्रँचायझी आपल्या संघाला मजबूत करण्यासाठी सज्ज आहेत. या मिनी ऑक्शनमध्ये फ्रँचायझी अशा स्टार ऑलराउंडर्सवर कोट्यवधी रुपयांची बोली लावू शकतात, जे फलंदाजीसह बॉलिंगमध्येही कमाल करू शकतात. अशा खेळाडूंची शोध टीम्स नेहमी घेत असतात, कारण हे एकटेच सामन्याचा कल बदलू शकतात. या पार्श्वभूमीवर पाच ऑलराउंडर्सवर या मिनी ऑक्शनमध्ये कोट्यवधी रुपयांची बोली लागण्याची शक्यता आहे.न्यूझीलंडचा ऑलराउंडर मायकेल ब्रेसवेल या आयपीएल २०२६ च्या मिनी ऑक्शनमध्ये सर्वात चर्चेतल्या ऑलराउंडर्सपैकी एक आहे. ब्रेसवेल हा डाव्या हाताचा चांगला फलंदाज असून ऑफ स्पिन गोलंदाजही आहे. ब्रेसवेलने अखेर आयपीएल २०२३ मध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूसाठी ५ सामने खेळले होते. यात त्याने ५८ धावा केल्या आणि ६ विकेट्स घेतल्या. तर, न्यूझीलंडसाठी ऊ२० आंतरराष्ट्रीय सामन्यात त्याने ४२ टी२० सामन्यांत एकूण ४१७ धावा केल्या आणि ३३ विकेट्स घेतल्या आहेत.

### शतक ठोकले अन् रँकिंग ढवळून निघाली, विराटच्या स्फोटक खेळीनंतर आयसीसी ची टॉप-५ रँकिंग बदलली

दिल्ली-साऊथ अफ्रिकेविरुद्धच्या पहिल्याच वनडेत विराट कोहलीच्या बॅटनं अशी धडाकेबाज कामगिरी केली की, चाहत्यांना मविंटेज कोहलीफ पाहिल्याचा आनंद मिळाला. विराटच्या शानदार शतकाचा प्रभाव केवळ मैदानापुरता मर्यादित न राहता थेट घ्ण रँकिंगवरही दिसून आला आहे. साऊथ अफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या सामन्यात शतक झळकावल्यानंतर विराट कोहलीच्या ध्ध रँकिंगमध्ये मोठी झेप बघायला मिळाली आहे.

आयसीसीने ३० नोव्हेंबर २०२५ रोजी पुरुष एकदिवसीय फलंदाजीची नवीन क्रमवारी जाहीर केली. यात विराटने टॉप-५ मध्ये शानदार पुनरागमन केले आहे.रोहित शर्मा पुन्हा एकदा नंबर १ फलंदाज

ताज्या क्रमवारीनुसार, रोहित शर्मा नंबर १ एकदिवसीय फलंदाज राहिला आहे. टीम इंडियाचा कर्णधार रोहित शर्मा ७८३ रेटिंग गुणांसह अव्वल स्थानावर आहे.

# विराटचा दोन डावातील सलग ११ शतकांचा विक्रम

मुंबई : विराट कोहलीने त्याचे ५३वे एकदिवसीय शतक झळकावले आहे. रायपूरमध्ये सुरू असलेल्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात त्याने ही कामगिरी केली. हे विराटचे ८४वे आंतरराष्ट्रीय शतक आहे. दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात त्याने ९९ चेंडूत आपले शतक पूर्ण केले. कोहलीने सलग तिसऱ्या सामन्यात ५० किंवा त्याहून अधिक धावा केल्या आहेत आणि हे त्याचे सलग दुसरे शतक आहे.विराट कोहली हा जगातील पहिला क्रिकेटपटू आहे ज्याने एकदिवसीय क्रिकेटमध्ये दोन डावांमध्ये सलग ११ वेळा शतके झळकावली आहेत.

सलग एकदिवसीय सामन्यांमध्ये शतके ठोकण्याच्या यादीत विराटनंतर एबी डिव्हिलियर्सचा क्रमांक लागतो, ज्याने असे सहा वेळा केले आहे. कोहलीने सचिन तेंडुलकरचा एकाच स्थानावर खेळून सर्वाधिक एकदिवसीय शतकांचा विश्वविक्रमही मोडला.

रांचीतील मालिकेच्या पहिल्या सामन्यातील १३५ धावांच्या अप्रतिम इनिंगनंतर हे सलग दुसरे शतक आहे. शतक पूर्ण होताच कोहलीने हेल्मेट काढून आकाशाकडे हात उंचावले. केएल राहुल धावत येऊन त्याला मिठी मारण्यासाठी तर उत्साही होता. 'कोहली, कोहली'च्या घोषणांनी मैदान दणाणून गेले होते.या शतकासह कोहलीने आता चार वेगवेगळ्या संघांविरुद्ध सात किंवा त्यापेक्षा जास्त शतके झळकावली आहेत. श्रीलंका (१०), वेस्ट इंडीज (९), ऑस्ट्रेलिया (८) आणि दक्षिण आफ्रिका (७). असा पराक्रम सचिन तेंडुलकरच्या नावावर होता. एक दिवस आधीच कोहलीने विजय हजारे ट्रॉफी खेळण्यासाठी उपलब्ध असल्याचे जाहीर केले. त्याआधी ऋतुराज गायकवाडनेही शानदार १०५ धावा ठोकल्या होत्या.




# १२ वर्ष, ३० डावांनंतर जो रूटचं ऑस्ट्रेलियात पहिलं कसोटी शतक!






## रिकी पाँटींगचा मोठा विक्रम मोडण्याची संधी

कॅनबेरा: ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्यात सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटीत जो रूटने दमदार शतकी खेळी केली आहे.

इंग्लंडचा संघ जेव्हा जेव्हा अडचणीत असतो, तेव्हा अनुभवी फलंदाज जो रूट खंबीरपणे उभा राहतो. ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्यात सुरू असलेल्या ॲशेस मालिकेतील दुसरा कसोटी सामना ब्रिसबेनमध्ये सुरू आहे. या सामन्यात प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या इंग्लंडला सुरूवातीलाच मोठे धक्के बसले होते. पण जो रूटने आपला अनुभव पणाला लावून एक बाजू धरून ठेवली. दरम्यान त्याने १८१ चेंडूंचा सामना करत ऑस्ट्रेलियात खेळताना पहिलं शतक झळकावलं आहे. यासह त्याच्या नावे मोठ्या विक्रमाची नोंद झाली आहे.जो रूट इंग्लंडच्या सर्वात अनुभवी खेळाडूंपैकी एक आहे. हे त्याच्या कसोटी कारकिर्दीतील ४० वे शतक आहे. पण मुख्य बाब म्हणजे त्याला ऑस्ट्रेलियात खेळताना एकही शतकी खेळी करता आली नव्हती. गेल्या कित्येक वर्षांपासून तो ऑस्ट्रेलियात कसोटी क्रिकेट खेळताना शतक झळकावण्याच्या प्रतिक्षेत होता. अखेर ब्रिसबेनच्या मैदानावर खेळताना त्याने ऑस्ट्रेलियात शतकांचं खातं उघडलं आहे. त्यामुळे हे शतक त्याच्यासाठी खूप खास आहे.

याआधी देखील जो रूट ऑस्ट्रेलियात शतक झळकावण्याच्या जवळ पोहोचला आहे.पण त्याला शतक पूर्ण करता आलं नव्हतं. २०२१-२२ मध्ये झालेल्या ब्रिसबेन कसोटीत तो ८९ धावांवर माघारी परतला होता. त्याआधी २०१३-१४ मध्ये झालेल्या ॲडिलेड कसोटीत तो ८७ धावांवर माघारी परतला होता. तर २०१७-१८ मध्ये झालेल्या सिडनी कसोटीत तो ८३ धावांवर माघारी परतला होता. जो रूटला ऑस्ट्रेलियात शतक झळकावण्यासाठी १२ वर्ष आणि ३० डाव वाट पाहावी लागली आहे.या शतकी खेळीसह जो रूटने मोठ्या विक्रमात श्रीलंकेचा माजी फलंदाज कुमार संगकाराला मागे टाकलं आहे. कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतकं झळकावणाऱ्या फलंदाजांच्या यादीत रूट चौथ्या स्थानी पोहोचला आहे. याआधी कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतकं झळकावणाऱ्या फलंदाजांच्या यादीत जो रूट आणि कुमार संगकारा दोघेही ३९-३९ शतकांसह संयुक्तरित्या चौथ्या स्थानी होते. आता रूटने कुमार संगकाराला मागे टाकलं आहे. आणखी १ शतक झळकावताच त्याच्याकडे रिकी पाँटींगच्या विक्रमाची बरोबरी करण्याची संधी असणार आहे.

## खेळाडुंसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध केल्या जातील – क्रीडा मंत्री

नांदेड,४ डिसेंबर-विद्यार्थ्यांनी आपल्या सुप्त कलागुणांना प्रोत्साहन देत स्पष्ट ध्येय निश्चित करावे. अडचणींवर मात करून कला गुणांच्या वृद्धीसाठी विविध स्पर्धांमध्ये सहभाग वाढवावा. खेळाडूंसाठी आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यासह निधीची कमतरता भासू देणार नाही, असे आश्वासन राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्री माणिकराव कोकाटे यांनी दिले. स्टेडियम परिसरातील डॉ. शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहात आयोजित विभागस्तरीय युवा महोत्सव २०२५-२६ च्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अंतर्गत उपसंचालक (क्रीडा व युवक सेवा) लातूर विभाग कार्यालय, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा परिषद, राष्ट्रीय सेवा योजना व माय भारत यांच्या संयुक्त विद्यमाने या युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी उपसंचालक महादेव कसगावडे, जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे, स्वारातीमचे सांस्कृतिक विभाग समन्वयक डॉ. संदीप काळे, माय भारतच्या जिल्हा युवा अधिकारी चंदा रावळकर, डॉ. सान्वी जेठवाणी, ऑलिंपिक संघटनेचे अध्यक्ष श्री. गील, राज्य क्रीडा मार्गदर्शक बालाजी सिरसीकर, क्रीडा अधिकारी संजय बेत्तीवार, शिवछत्रपती पुरस्कारार्थी जनार्दन गुपीले आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

आगामी ऑलिंपिकमध्ये भारताला अधिकाधिक पदके मिळवून देण्यासाठी खेळाडूंना सर्व प्रकारच्या सुविधा, आवश्यक ते प्रशिक्षण आणि निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे श्री. कोकाटे यांनी स्पष्ट केले. नांदेड क्रीडा संकुलाचा प्रश्न तात्काळ मार्गी लावण्यात येऊन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा उपलब्ध करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.यावेळी त्यांनी जिल्ह्यातील क्रीडा कार्यालयाच्या योजनांचा, उपलब्ध निधीचा, तालुका क्रीडा संकुलातील कामांचा, तसेच कोणत्या खेळांचा प्रसार अधिक आहे व कोणत्या मैदानांवर नियमित सराव केला जातो याचा सविस्तर आढावा घेतला. विविध क्रीडा संघटना व खेळाडूंच्या अडचणी जाणून घेऊन त्यांच्यासाठी पायाभूत सुविधा उभारण्याची ग्वाही त्यांनी दिली. सचखंड श्री हुजूर साहिब गुरुद्वाराच्या स्टेडियमच्या मागणीवरही त्यांनी सकारात्मक भूमिका मांडली आणि कामे लवकर पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. यावेळी युवा कला स्पर्धकांना स्पर्धेसाठी त्यांनी शुभेच्छा देत विभागाचे नावलौकिक वाढवावे असे आवाहन केले.

## जो रुट- जोफ्रा आर्चरने ऑस्ट्रेलियाला रडवले, टी २० स्टाईल फलंदाजी

रांची-ॲशेसमधील ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्यातील दुसरी कसोटी आजपासून ब्रिसबेन येथे सुरु झाली आहे. पहिला दिवस इंग्लंडकडून जो रुटनं गाजवला. तर, ऑस्ट्रेलियाकडून मिशेल स्टार्कनं सहा विकेट घेतल्या. पहिल्या दिवसअखेर इंग्लंडनं ९ बाद ३२५ धावा केल्या आहेत. जो रुटनं कसोटीमधील ४० वं शतक झळकावलं. पहिला संपला तेव्हा जो रुट आणि जोफ्रा आर्चर यांच्यात ४४ बॉलमध्ये ६१ धावांची भागीदारी झाली होती.

इंग्लंडचा सलामीवीर जॅक क्रॉलीनं ७६ धावा केल्या. मात्र, बने डकेट आणि ओली पोप यांना खातं देखील उघडता आलं नाही. क्रॉली आणि जो रुट यांच्या ११७ धावांच्या भागीदारीनं इंग्लंडच्या संघाला संकटातून बाहेर काढलं. हॅरी ब्रूक ३१ धावा करुन बाद झाला. तर, बेन स्टोक्स जोश इंग्लिशच्या अफलातून थ्रो मुळं धावबाद झाला. पहिल्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत जो रुटनं १३५ धावंची खेळी केली आहे. ऑस्ट्रेलियात जो रुटनं हे पहिलं शतक केलं आहे. त्याचं कसोटी करिअरमधील हे ४० वं शतक होतं. जो रुटनं पदार्पणानंतर १३ वर्षांनी पहिल्यांदा ऑस्ट्रेलियात शतक केलं आहे.


इंग्लंडनं त्यांची नववी विकेट २६४ धावांवर गमावली होती. ९ बाद २७३ धावा या धावसंख्येनंतर इंग्लंडनं वेगात धावा जमवल्या. जो रुट आणि जोफ्रा आर्चर या दोघांनी तुफानी फटकेबाजी करत ५ ओव्हरमध्ये ५२ धावा केल्या. जोफ्रा आर्चरनं दोन षटकारांसह २६ बॉलमध्ये ३२ धावा केल्या. जो रुटसह मिळून त्यानं १० व्या विकेटसाठी ६१ धावांची भागीदारी केली. यामुळं इंग्लंडने ३०० धावांचा टप्पा पार केला.

ऑस्ट्रेलियाकडून सर्वाधिक यशस्वी गोलंदाज मिशेल स्टार्क ठरला. मिशेल स्टार्कने ६ विकेट घेतल्या. स्टार्कनं ॲशेसमध्ये आतापर्यंत १६ विकेट घेतल्या आहेत. स्टार्क ॲशेसमधील यशस्वी गोलंदाज ठरला आहे.

दरम्यान, पहिल्या कसोटीत ऑस्ट्रेलियाने इंग्लंडला पराभूत केले होते. त्यामुळे त्यांनी इंग्लंड विरुद्ध १-० अशी आघाडी घेतली होती. पहिल्या कसोटीतील विजयासह ऑस्ट्रेलिया जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या गुणतालिकेत पहिल्या स्थानावर पोहोचली होती.

### ४० बॉलमध्ये अख्खी मॅच फिरवली , टी२० मालिकेआधी हार्दिक पांड्याचा धमाका

मुंबई-येत्या ९ डिसेंबर २०२५ पासून भारत आणि साऊथ आफ्रिका यांच्यातील पाच सामन्यांच्या टी२० मालिकेला खेळवली जाणार आहे. या मालिकेसाठी टीम इंडियाचा ऑल राऊंडर हार्दिक पांड्या याची संघात निवड झाली आहे.दरम्यान या मालिकेआधी हार्दिक पांड्या देशांतर्गत क्रिकेटमध्ये खेळताना दिसतोय. या स्पर्धेत हार्दिक पांड्याच्या टीमने खतरनाक खेळी केली आहे. या खेळीच्या बळावर हार्दिकच्या संघाने अवघ्या ४० बॉलमध्ये सामना जिंकला आहे. सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी स्पर्धेत आज गुजरात आणि बरोडा या दोन संघात सामना पार पडला. या सामन्यात गुजरात संघ प्रथम फलंदाजी करताना ७३ धावांवर ऑलआऊट झाला होता.



. जर्मनीतील मोंचेनग्लॅडबाख येथे सुरू असलेल्या जर्मन कप फुटबॉल सामन्यात भाग घेताना बोरुसिया मोंचेनग्लॅडबाख आणि एफसी सेंट पॉलीचे खेळाडू.

# विराट आणि रोहितला डिवचणाऱ्यांना रवी शास्त्रींचा स्पष्ट इशारा; म्हणाले, त्या दोघांचं डोकं...

**नवी दिल्ली:** भारताचे माजी क्रिकेटपटू आणि माजी मुख्य प्रशिक्षक यांनी विराट कोहली आणि रोहित शर्माची बाजू घेतली असून त्यांच्या भवितव्याबाबत वावड्या उठवणाऱ्यांना स्पष्ट इशारा दिला आहे. आगामी २०२७ च्या एकदिवसीय विश्वचषकासाठी भारताचा संघ कसा असेल आणि त्यात या दोन वरिष्ठ खेळाडूंचे स्थान असेल का? यावरून गेले काही दिवस बरीच उलटसुलट चर्चा सुरू आहे. या चर्चांवर बोलत असताना रवी शास्त्री यांनी संताप व्यक्त केला.

नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत बोलत असताना रवी शास्त्री यांनी दोन्ही ज्येष्ठ खेळाडूंना बाजूला करणे योग्य नसल्याचे म्हटले. कसोटी आणि टी२० क्रिकेटमधून विराट कोहली आणि रोहित शर्माने निवृत्ती घेतल्यानंतर दोन्ही खेळाडूंच्या क्षमतांवर शंका घेणाऱ्यांना रवी शास्त्री यांनी सुनावले आहे.



प्रभात खबरला दिलेल्या मुलाखतीत रवी शास्त्री म्हणाले, ङ्गविराट कोहली आणि रोहित शर्मा हे दोघेही एकदिवसीय क्रिकेटमधील दिग्गज खेळाडू आहेत. तुम्ही अशा गुणवंत खेळाडूंशी गैरव्यवहार करू शकत नाहीत.ङ्ख या दोघांच्या क्षमतेवर कोण शंका घेत आहे? असा प्रश्न रवी शास्त्री यांना विचारण्यात आला. यावर त्यांनी कुणाचेही नाव घेतले नाही.

डढजठखएड धजण चअध ङखघए

खछऊीी डअ: 'या' खेळाडूमुळे टीम इंडियाचा पराभव झाला; इरफान पठाणने स्टार खेळाडूवर फोडलं पराभवाचं खापरझ्हीीं: 'ब्लॅक मोनोकिनी, निळा समुद्रः' रुचिरा जाधवच्या फोटोंनी वेधले लक्ष ङ्गतिच्याशी लग्नःङ्ख, माधुरी दीक्षितचं स्थळ सुरेश वाडकरांनी नाकारलं? अखेर 'त्या' चर्चांवर सोडलं मौन; म्हणालेःतितक्यात रवी शास्त्रींचा मेसेज आला, अमोलला सांगाःङ्ख, असं झालेलं कोच अमोल मुझुमदारांचं मुंबई क्रिकेटमध्ये पदार्पण

रवी शास्त्री म्हणाले, काही लोक असा प्रयत्न करत आहेत. म्हणून मी असे म्हणालो. ङ्गजर या दोघांनी आपला रोख बदलला आणि योग्य ती कळ दाबली तर जे त्यांच्याबाबत कुचाळक्या करत आहेत, ते कुठच्या कुठे फेकले जातीलङ्ख, असेही ते म्हणाले. रवी शास्त्री यांचे विराट कोहलीशी अतिशय जवळचे संबंध आहेत. तर रोहित शर्माबरोबरही त्यांनी जवळून काम केले आहे.त्या दोघांचं डोकंः-प्रभात खबरशी बोलताना ते म्हणाले, ङ्गअशा खेळाडूंबरोबर तुम्ही मस्ती करू नका. काही जण असे करत आहेत. पण त्या दोघांचं (विराट आणि रोहित) डोकं ठिकाणावर आलं आणि त्यांनी निर्णय घेतला तर आजूबाजूला जे दिसत आहेत, ते सर्व गायब होतील.

रवी शास्त्री यांचे विधान अशा परिस्थितीत आले आहे, जेव्हा भारतीय क्रिकेट संघ अडचणीत आहे. दक्षिण आफ्रिकेने कसोटी मालिकेत भारताला पराभवाची धूळ चारल्यानंतर कसोटी संघावर बरीच

## जयक्रांती महाविद्यालयाच्या हर्षवर्धन काळे यांचा गौरव



**लातूर/प्रतिनिधी :** २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षासाठी UNSTOP कॅम्पस ॲम्बेसेडर म्हणून हर्षवर्धन काळे यांची निवड झाली असून, देशभरातील २५००० प्रतिभावान स्पर्धक विद्यार्थ्यांमधून झालेली ही निवड विशेष कौतुकास्पद ठरली आहे. UNSTOP AF Live Consulting हे विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला दिशा देणारे, सतत शिकत राहण्यास प्रेरणा देणारे आणि योग्य करिअर-संधी उपलब्ध करून देणारे देशातील सर्वांत मोठे कम्युनिटी एंगेजमेंट आणि हायरिंग प्लॅटफॉर्म आहे.हर्षवर्धन यांचे हे यश युवकांना विविध अडथळ्यांवर मात करून पुढे जाण्याची प्रेरणा देणारे असून त्यांनी आपली क्षमता राष्ट्रीय स्तरावरही सिद्ध केली आहे. खखच् बेंगळुरू येथे नुकत्याच आयोजित केलेल्या VENIX'25 या राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित स्पर्धेत झालेल्या ट्रेझर हंट इव्हेंटमध्ये त्यांनी उत्तुंग कामगिरी करत द्वीतीय उपविजेता पद मिळवले. या दुहेरी यशामुळे जयक्रांती महाविद्यालयाचा व लातूरचा गौरव वाढला आहे.

संस्थेचे सचिव प्रा. गोविंदराव घार, अध्यक्ष श्री बालाजी घार, प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे, प्राचार्य प्रशांत घार, IQAC समन्वयक डॉ. सतीश डांगे,स्टाफ सेक्रेटरी डॉ संगीता घार, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.समीना शेख, डॉ. दिलीप गुंजरगे, डॉ.रामेश्र्वर स्वामी, प्रा. सुवर्णा शिंदे, प्रा. प्रज्ञा स्वामी यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व सहकाऱ्यांनी हर्षवर्धन काळे याचे अभिनंदन करून त्याच्या पुढील यशस्वी वाटचालीला शुभेच्छा दिल्या आहेत.

## प्राथमिक शिक्षकांसाठी 'गणिती खेळ' विभागीय स्तरावरील प्रशिक्षणाचे उद्घाअट दयानंद कलात संपन्न



**लातूर/प्रतिनिधी** :एस सी इ आर टी पुणे, डायट मुरुड व जे पाल यांच्या संयुक्त विद्यमाने पी एम श्री प्रकल्पांतर्गत प्राथमिक शिक्षक इयत्ता पहिली च्या शिक्षकांसाठी गणित खेळ विभागस्तर प्रशिक्षण दयानंद कला महाविद्यालय लातूर येथे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या सहकार्याने गुरुवार दिनांक ४ डिसेंबर ते ६ डिसेंबर या कालावधीत संपन्न होत आहे. सदरील प्रशिक्षणासाठी लातूर,नांदेड व धाराशिव या जिल्ह्यातील पीएम श्री शाळेतील शिक्षक सहभागी झालेले असून या प्रशिक्षणाचे उद्घाटन आज डायटचे वरिष्ठ अधिव्याख्याता श्री जगन्नाथ कापसे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून दयानंद कला महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ दिलीप नागरगोजे हे उपस्थित होते.

सदरील प्रशिक्षणाचे आयोजन व नियोजन श्री विजयकुमार सायगुंडे यांनी केलेले आहे तसेच व्यासपीठावर धाराशिव डायटच्या श्रीमती निलोफर पटेल, वरिष्ठ अधिव्याख्याता श्रीमती गीता मेनकुदळे,नांदेडच्या वरिष्ठ अधिव्याख्याता श्रीमती किरण रापतवार , जे पाल चे प्रतिनिधी श्री विशाल गोहणे, श्री पवन चव्हाण उपस्थित होते

सदरील तीन दिवसीय प्रशिक्षणात या शिक्षकांना इयत्ता पहिली वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी गणित खेळ माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य विकसित करण्यासाठी कृतीयुक्त कार्यक्रम हाती घेण्यात आला असून तो यशस्वीपणे पार पाडण्यासाठी अंमलबजावणी करण्यासंदर्भात प्रत्यक्ष प्रात्यक्षिके घेऊन प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये गणित विषयाबद्दलची भीती दूर होऊन गणित हा विषय गोडीने व आपुलकीने शिकतील अशी आशा आहे

या प्रशिक्षणासाठी सुलभक म्हणून विकास दिवटे व सारिका हेगडकर (धाराशिव), बलभीम गायकवाड व डीएम कांबळे (लातूर), गजानन लाडकेकर व प्रल्हाद ढाकणे ( नांदेड) प्रशिक्षण देत आहेत.

# महावितरण नेहमीच दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या पाठीशी : संचालक राजेंद्र पवार

## दिव्यांग दिन उत्साहात साजरा

**मुंबई/प्रतिनिधी :** दिव्यांग कर्मचाऱ्यांना सहायक उपकरणे पुरवण्याच्या उपक्रमात महावितरणने आत्तापर्यंत राज्यभरातील ४९ दिव्यांग कर्मचाऱ्यांना दुचाकी उपलब्ध करुन दिल्या आहेत. तर आगामी सुमारे ५ हजार तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या भरती प्रक्रियेत नियमानुसार ४१२ जागा दिव्यांगासाठी राखीव ठेवण्यात आल्याची माहिती देतानाच महावितरण व्यवस्थापन नेहमीच दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या पाठीशी असल्याची ग्वाही संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांनी दिली.

महावितरणचे मुख्यालय असलेल्या मुंबईतील प्रकाशगड येथे दिव्यांग दिनानिमित्त बुधवारी (दि. ०३ डिसेंबर) आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. मानव संसाधन विभागाचे महाव्यवस्थापक श्री. राजेंद्र पांडे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. संजय ढोके यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. संचालक श्री. पवार म्हणाले, आज दिव्यांगजन सर्वच क्षेत्रात स्वकृर्तृत्वाने यशाची उत्तुंग भरारी घेत आहेत. तीव्र इच्छाशक्ती व अढळ विश्वासाच्या बळावर न्युनगंडावर मात करण्याचे आवाहन त्यांनी दिव्यांग कर्मचाऱ्यांना केले. तर दिव्यांग कर्मचाऱ्यांशी कोणताही भेदभाव न करण्याची शपथ घेऊन संकल्प करण्याचे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले.

महावितरणमध्ये कार्यरत दिव्यांग कर्मचाऱ्यांना त्यांचे दैनंदिन कामकाज अधिक सुकर व्हावे, यासाठी अधिक खबरदारी घेण्यात येते. त्यांना दिव्यांग भत्ता नियमितपणे दिला जातो. चुकीच्या पद्धतीने दिव्यांग प्रमाणपत्राच्या आधारे सेवेत येण्याचा कोणी प्रयत्न करीत असल्यास, अशा बाबी तत्काळ निदर्शनास आणून देण्याबाबत संचालक पवार यांनी सूचित केले.

जगभरातील विख्यात दिव्यांग लेखकांची पुस्तके व पुष्पगुच्छ देऊन मुख्य कार्यालयात कार्यरत २३ दिव्यांग कर्मचाऱ्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या वतीने परेश बोरकर आणि रोहिणी साठे यांनी मनोगत व्यक्त केले. व्यवस्थापनाबाबत कृतज्ञता व्यक्त करताना सुविधासंदर्भातच्या अपेक्षा दिव्यांग कर्मचाऱ्यांनी व्यक्त केल्या. या मागण्यांची तातडीने पुर्तता करण्याच्या सूचना संचालक पवार यांनी संबंधितांना दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वरिष्ठ व्यवस्थापक प्रणाली निमजे यांनी केले. तर सहमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी ललित गायकवाड यांनी आभार मानले.



दिव्यांग दिनानिमित्त प्रकाशगड येथे आयोजित कार्यक्रमात दिव्यांग कर्मचाऱ्यांसमवेत संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार, महाव्यवस्थापक श्री. राजेंद्र पांडे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. संजय ढोके आदी.

# लातूरच्या श्री सदानंद दत्त मठात दत्त जयंती निमित्त हजारो भाविकांनी घेतले दर्शन

**लातूर/प्रतिनिधी :** लातूरच्या औसा रोडवरील भाविकांचे श्रद्धास्थान असलेले श्री सदानंद दत्त मठात गुरुवारी सकाळी सात वाजल्यापासून सायंकाळी अकरा वाजेपर्यंत श्री सद्गुरु दत्ताचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची रिंग लागली होती दिवसभरात १५ हजार पेक्षा जास्त भाविकांनी सद्गुरु श्री दत्ताचे दर्शन घेतले दरम्यान सकाळी सात वाजता नित्य नियमाप्रमाणे व्यासपूजा ,गुरुपूजन पालखी, गुरुमंत्र या धार्मिक विधिवत पूजन संस्थांच्या वतीने करण्यात आले दत्त मंदिर संस्थानचे अमृत महाराज यांच्या हस्ते धार्मिक विधी करण्यात आला दत्त जयंती असल्याने दर्शनासाठी मोठी गर्दी झाली होती यासाठी पोलीस प्रशासनाने मोठा पोलिस बंदोबस्त तैनात केला आहे एक किलोमीटर अंतरावर दर्शन घेण्यासाठी रांग लागली आहे





**महिलांची लक्षणीय उपस्थिती**

लातूर येथील औसा रोड भागातील श्री सदानंद दत्त मठ हे अनेक वर्षापासून या ठिकाणी असून लातूर शहर व परिसरातील भाविकांचे श्रद्धास्थान असल्याने या ठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी झालेली होते दर्शनासाठी तीन ते चार तास लागत होते यासाठी मंदिर संस्थांच्या वतीने महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र रांगेची व्यवस्था केली होती उपस्थित लोकांना या ठिकाणी मंदिर समितीकडून महाप्रसादाचे वाटप करण्यात आले यासाठी मंदिर समितीचे पदाधिकारी कार्यकर्ते भक्तगणांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले घेत आहेत

## शहरातील मुख्य रस्ते सफाईसाठी महानगरपालिकेने सुरू केली विशेष स्वच्छता मोहिम




**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहरातील सर्व मुख्य रस्त्यावर पडणारा कचरा व रस्त्याच्या साफसफाई ला प्राधान्य देत लातूर शहर महानगरपालिकेच्या आयुक्त मानसी यांच्या सूचनेनुसार उपायुक्त वसुधा फड यांनी विशेष स्वच्छता मोहिमेचे आयोजन केले असून सदरील मोहिम पुढील २ दिवस नियमितपणे सुरू ठेवून शहरातील सर्वच मुख्य रस्ते सफाई व मुख्य रस्त्यावरील डिव्हायडर च्या बाजूची माती काढणे तसेच रस्त्याच्या बाजूचा कचरा साफसफाईचे नियोजन करण्यात आले आहे.

४ डिसेंबर रोजी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते राजीव गांधी चौक या भागामध्ये सदर मोहीम राबविण्यात आली असून ज्यामध्ये महानगरपालिकेचे १०० सफाई कर्मचारी एकत्र करून सदर मोहीम राबविण्यात आली. सदरील कामाची पाहणी करण्यासाठी स्वतः उपायुक्त वसुधा फड या सकाळी ६ पासून शहरात फिरत असून त्यांच्या समवेत मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख, स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे हे देखील उपस्थित होते. वरीष्ठ अधिकाऱ्यांकडून पाहणी करून स्वच्छतेच्या कामाचे नियोजन करण्यात येत आहे.

तसेच दि.०५.१२.२०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौक ते नवीन जिल्हाधिकारी कार्यालय बार्शी रोड या मुख्य रस्त्यावर सदरील मोहिमेचे आयोजन करण्यात तेणार आहे. ज्या मध्ये उपायुक्त, मुख्य स्वच्छता अधिकारी, स्वच्छता विभाग प्रमुख, मुख्य स्वच्छता निरीक्षक, सर्व स्वच्छता निरीक्षक, मुकादम, सफाई कामगार, कचरा उचलण्यासाठी ट्रॅक्टर व यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे.

## ४३ बॉक्स बंदी असलेले प्लास्टिकचा साठा जप्त; ५ हजार दंड वसुल

**लातूर/प्रतिनिधी :** ४ डिसेंबर रोजी आयुक्त श्रीमती मानसी मॅडम यांच्या आदेशावरून तसेच उपायुक्त वसुधा फड स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांतजी पिडगे,मुख्य स्वच्छता अधिकारी कलिम शेख,क्षेत्रिय अधिकारी रवि कांबळे यांच्या उपस्थितीत रिंग रोड या भागात बंदी असलेले प्लास्टिक वाहतूक करत असलेल्या एका वाहनावर छापा टाकण्यात आला. यामध्ये बंदी असलेले एकूण ४३ बॉक्सेस अंदाजे ६०० किलो प्लास्टिकचा साठा जप्त करण्यात आला. या मोहिमेत मुख्य स्वच्छता निरीक्षक धोंडीराम सोनवणे, शिवराज शिंदे, अक्रम शेख, स्वच्छता निरीक्षक प्रदिप गायकवाड, अशिष साठे, महादेव फिस्के व कर्मचारी उपस्थित होते.



# भारतीय रेल्वेने निवडक गाड्यांमध्ये तत्काळ तिकिट बुकिंगसाठी ओटीपी-आधारित प्रमाणीकरण सुरू केले

**सोलापूर/प्रतिनिधी :** भारतीय रेल्वे ०६.१२.२०२५ पासून मध्य रेल्वेवरील खालील गाड्यांमध्ये तत्काळ तिकिट बुकिंगसाठी नवीन ओटीपी-आधारित प्रमाणीकरण प्रणाली लागू करणार आहे.

ही नवीन प्रणाली संगणकीकृत पीआरएस काउंटर, अधिकृत एजंट आणि आयआरसीटीसी वेबसाइट/ॲपद्वारे बुक केलेल्या तत्काळ तिकिटांसाठी लागू असेल. या प्रक्रियेअंतर्गत, प्रवाशांना बुकिंगच्या वेळी दिलेल्या मोबाइल नंबरवर एक वेळ वापरायचा पासवर्ड (ओटीपी) मिळेल. यशस्वी ओटीपी पडताळणीनंतरच तत्काळ तिकिट जारी केले जाईल.

या उपाययोजनेचा उद्देश पारदर्शकता आणखी वाढवणे, गैरवापर रोखणे आणि तात्काळ कोट्यातील बुकिंगचा लाभ योग्य प्रवाशांना मिळावा याची खात्री करणे हा आहे.

ही सुविधा ०६.१२.२०२५ पासून खालील गाड्यांसाठी लागू केली जाईल

१. १२२१९ लोकमान्य टिळक टर्मिनस सिकंदराबाद दुरांतो एक्सप्रेस

२. १२२२१ पुणे हावडा दुरांतो एक्सप्रेस

३. १२२२३ लोकमान्य टिळक टर्मिनस एर्नाकुलम जंक्शन दुरांतो एक्सप्रेस

४. १२२६१ छत्रपति शिवाजी महाराज टर्मिनस हावडा दुरांतो एक्सप्रेस

५. १२२६३ पुणे हजरत निजामुद्दीन जंक्शन दुरांतो एक्सप्रेस

६. १२२८९ छत्रपति शिवाजी महाराज टर्मिनस नागपूर दुरांतो एक्सप्रेस

७. १२२९० नागपूर छत्रपति शिवाजी महाराज टर्मिनस दुरांतो एक्सप्रेस

८. १२२९३ लोकमान्य टिळक टर्मिनस प्रयागराज दुरांतो एक्सप्रेस

९. १२२९८ पुणे अहमदाबाद जंक्शन दुरांतो एक्सप्रेस

१०. २०१०१ नागपूर सिकंदराबाद वंदे भारत एक्सप्रेस

११. २०६७० पुणे हुबळी जंक्शन वंदे भारत एक्सप्रेस

१२. २०६७३ छत्रपती शाहू महाराज टर्मिनस कोल्हापूर पुणे वंदे भारत एक्सप्रेस

१३. २०६७४ पुणे छत्रपती शाहू महाराज टर्मिनस वंदे भारत एक्सप्रेस



१४. १२०२५ पुणे हैदराबाद शताब्दी एक्सप्रेस

१५. २२२२१ छत्रपति शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई हजरत निजामुद्दीन जंक्शन राजधानी एक्सप्रेस (दि. ०५.१२.२०२५ पासून)

सूचना : १२०२५ पुणे हैदराबाद शताब्दी एक्सप्रेससाठी ही व्यवस्था ०१.१२.२०२५ पासूनच लागू करण्यात आलेली आहे. मध्य रेल्वे प्रवाशांना विनंती करीत आहे की, गैरसोय टाळण्यासाठी तात्काळ तिकीट बुकिंग करताना आपला मोबाईल क्रमांक अचूकरीत्या नमूद करावा.

## दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात सुयश शेटे या यशस्वी खेळाडूचा सत्कार

**लातूर/प्रतिनिधी :** ऑल महाराष्ट्र वुशू असोसिएशन व वुशू धुळे असोसिएशन आयोजित २३ वी ज्युनिअर राज्यस्तरीय वुशू अजिंक्यपद स्पर्धा दि.१७ ते २० नोव्हेंबर २०२५ रोजी धुळे येथे पार पडलेल्या स्पर्धेत दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचा इयत्ता बारावीचा सुयश सोमेश्वर शेटे या विद्यार्थ्याने १९ वर्षे वयोगटात गोल्ड मेडल प्राप्त केले तसेच इंडियन फेडरेशन थायबॉक्सिंग आयोजित दि.०७ ते ०९ नोव्हेंबर २०२५ रोजी अमृतसर पंजाब या ठिकाणी झालेल्या राष्ट्रीय थायबॉक्सिंग १९ वर्षे वयोगट स्पर्धेतही गोल्ड मेडलही प्राप्त केले.याबद्यल या यशस्वी खेळाडूचा त्याच्या पालकांसहित सत्कार दयानंद शिक्षण संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड,महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे,डायट मुरुडचे वरिष्ठ अधिकारी डॉ. जगन्नाथ कापसे,उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.या यशस्वी खेळाडूला डॉ.महेश बेंबडे,प्रा.निशिकांत सदाफुले,प्रा.विनोद गवरे,प्रा.वैष्णवी जोशी यांचे मार्गदर्शन लाभले.



याप्रसंगी पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरुडकर,पर्यवेक्षिका डॉ.संध्या वाडीकर,सेल्फ फायनान्सचे प्राचार्य प्रा.अनिलकुमार माळी, कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव,प्रा. निशिकांत सदाफुले,डॉ.कोमल गोमारे,प्रा. विजयकुमार मांदळे, प्रा.व्यंकट कैले,प्रा. आय.जे.शेख, सुनीलकुमार सातपुते,पवार डी. जी.,पालक सोमेश्वर शेटे,सौ.शुभांगी शेटे यांच्यासह इतर शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले टिकाऊ रबरी शिक्के तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# करवंजीच्या शेतकऱ्यांना सोलापुरातील शिवारात पिकांचे धडे:

## शेळीपालन, केळी व्यवस्थापन, लागवड व बाजारपेठेविषयी माहिती घेतली



लोहारा(प्रतिनिधी)–लोहारा तालुक्यातील करवंजीमधील शेतकऱ्यांनी सोलापूर जिल्ह्यातील मोटेवाडी (ता. माळशारिस) येथे भेट देत शेळीपालन व्यवसाय, केळी, डाळिंब, आंबा आदी फळपिके, बागांमध्ये लागवडीपासून ते बाजारपेठेपर्यंतची माहिती जाणून घेतली. लोहारा तालुका कृषी अधिकारी कार्यालय व ज्ञानप्रबोधिनी संस्था हराळी यांच्या संकल्पनेतून रविवारी (दि. ३०) लोहारा तालुक्यातील शेतकऱ्यांचा स्वखर्चातून अभ्यास दौरा आयोजित केला होता.

शेतकऱ्यांना प्रगतशील ज्ञान अवगत व्हावे, शेतीपूरक व्यवसाय करून शेतकरी आत्मनिर्भर व्हावा व आपल्या तालुक्यात शेतकऱ्यांनी नवनवीन प्रयोग करून लोहारा तालुक्यातील इतर शेतकऱ्यांनी त्याचा उपयोग व्हावा, याच उद्देशाने रविवारी (दि. ३०) लोहारा तालुक्यातील करवंजी येथील माऊली शेतकरी गटाच्या १५ शेतकऱ्यांसह किसन सूर्यवंशी व सुरेश मरगळे यांनी विविध ठिकाणी भेटी दिल्या. लोहारा तालुक्यातील मंडळ कृषी अधिकारी, उपकृषी अधिकारी व सहायक कृषी अधिकारी यांनी व तालुका कृषी अधिकारी महेश देवकाते यांनी दिवसभर शेतकऱ्यासमवेत उपस्थित राहून शेळीपालन, पोल्ट्री उद्योग, केळी, जर्शी गाय व गोठा व्यवस्थापन, केळी व आंबा फळपीक व्यवस्थापन तसेच शेवगा प्लॉट आदी सर्व प्रगतशील शेतकऱ्याच्या प्लॉटची निवड करून त्यांच्या प्लॉटची माहिती देण्याची परिपूर्ण व्यवस्था केली होती. शेळीपालन अन् दुग्धोत्पादनाचे जाणून घेतले बारकावे या शेतकऱ्यांनी प्रथम पायल गोट फार्म मोटेवाडी (जि. सोलापूर) यांच्या शेळीपालन प्रकल्पास भेट देऊन त्यांच्या शेळीपालन संगोपन पद्धत, तुती, गोपीकृष्ण गवत, यशवंत घास, सोयाबीन / तूर / हरभरा भुसा अशा विविध चारा पिके, विविध खुराक, शेळ्यांच्या विविध जाती यांची माहिती घेतली.

नवनाथ व लखन हांडे यांच्या एचएफ जर्शी गायीच्या गोठ्याला भेट देऊन त्यांची पालनपद्धत, त्यांचे वेळापत्रक, चारा पिके, मुरघास महत्व व त्याचा वापर यांची माहिती घेतली. व्यवस्थापन अन् कीड नियंत्रणाची दिली माहिती मोहन दडस यांच्या दोन एकर केळी निर्यात प्लॉटला भेट देऊन सविस्तर माहिती घेतली तसेच त्यांच्या ५ एकर केशर आंबा प्लॉटला भेट देऊन त्यांनी आंबा पिकाची सविस्तर माहिती सांगितली. भांबुर्डी येथील जनक वाघमोडे यांच्या १५ एकर शेवगा प्लॉटला भेट देऊन त्यांनी स्वतः शेवगा पिकाचे विविध केलेले प्रयोग, त्यातून त्यांनी केलेला बदल व यात त्यांनी वार्षिक १ कोटीपर्यंत घेतलेले उत्पन्न याची सर्व उपस्थित शेतकऱ्यांनी यशोगाथा ऐकली. तसेच जनक वाघमोडे यांच्या १० एकर डाळिंब बागेला व केळी पिकाला भेट देऊन त्या फळपिकांचे बहार व्यवस्थापनाबद्दल माहिती दिली.

# मांजरा नदीवरील बंधाऱ्यावर बसवले १० लाखांचे दरवाजे

## युवासेना तालुकाप्रमुख भराटेंनी केला स्वत:खर्च



वाशी(प्रतिनिधी) –मान्सूनमध्ये अतिवृष्टीमुळे नदीला मोठ्या प्रमाणावर पाणी आले. त्यात मांजरा नदीवरील बंधाऱ्याला स्वखर्चातून १० लाखांचे दरवाजे मंगळवारी बसवण्यात आले. शिवसेना (उबाठा) चे युवा सेना तालुका प्रमुख गणेश भराटे यांनी स्वत: खर्च केला.

वाशी तालुक्यातील पारा, डोंगरेवाडी यांच्यासह अनेक गावे येतात. शेतकऱ्यांना रब्बी हंगामासाठी या नदीतील पाण्याचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होतो. तसेच पाणी अडवल्यास आसपासच्या २० ते २५ गावांतील जलस्त्रोतांचे पाणी दीर्घकाळ टिकते. तरीही मागील २५ वर्षांपूर्वी तत्कालीन पाटबंधारेमंत्री पद्मसिंह पाटील यांनी बंधारे बांधून बसवलेल्या दरवाजे खराब होऊन, वाहून गेल्यानंतर त्याकडे कोणीच लक्ष दिले नसल्याने पाणी वाहून जात होते. शेतकऱ्याला नदीच्या पाण्याचा उपयोग होत नव्हता. शेतकऱ्याची ही समस्या लक्षात घेऊन डोंगरेवाडी येथील शिवसेना (उबाठा) चे युवा सेना तालुकाप्रमुख गणेश भराटे यांनी शिवसेना नेते प्रशांत चेडे यांच्याशी चर्चा करून त्यांच्या मार्गदर्शनाखाली दरवाजे बसवण्याचा निर्णय घेतला. यासाठी त्यांना फुलचंद तांबडे यांनी सहकार्य केले. डोंगरेवाडीतील असलेल्या बंधाऱ्याला एकूण १२५ दरवाजे असल्याने मोठा खर्च येणार हे निश्चित होते. त्या ठिकाणी असलेल्या पूर्वीच्या २५ दरवाजांची दुरुस्ती व नव्याने १०० दरवाजे खरेदी केले. ज्यासाठी १० लाख रुपये खर्च आला. बुधवारी डोंगरेवाडी,पारा यासह या बंधाऱ्यात अडवलेल्या पाण्यामुळे लाभ मिळणाऱ्या शेतकऱ्यांच्या उपस्थितीत बंधाऱ्याला दरवाजे बसवण्यात आले. त्याचा फायदा उन्हाळ्यात होणार आहे. वाहून जाणारे पाणी अडवले गेल्याने उन्हाळ्यात शेतीसाठी जाणवणारी पाण्याची टंचाई जाणवणार नाही. त्याचा फायदा होईल.

पाण्याची बचत होऊन उन्हाळ्यातही फायदा दरवाजांमुळे रब्बी हंगामासाठी नदीपात्रात पाणी साठून राहणार आहे. पारा, डोंगरेवाडी व आसपासच्या शेतकऱ्यांना याचा फायदा होणार आहे. उन्हाळ्यात पाणी वाहून जाईल. आता दरवाजातून पाणी जाणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. या कार्यक्रमासाठी फुलचंद तांबडे, सर्जेराव कुरूंद, मच्छिंद्र कुरूंद, सर्जे राव तांबडे, औदुंबर भराटे, युवराज कुरूंद, बाजीराव भराटे यांच्यासह परिसरातील शेतकरी बंधारे बसवताना या वेळी उपस्थित होते.

# माजी समाज कल्याण सभापती जनार्धन वाघमारे यांचे निधन



तुळजापूर(विजय पिसे)– तालुक्यातील सलगरा मड्डी येथील फुले शाहू आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ नेते धाराशिव जिल्हा परिषदचे माजी समाज कल्याण सभापती जनार्धन वाघमारे (बापू ) यांचे दिर्घ आजाराने निधन झाले आहे.

सलगरा (मड्डी )येथील सर्वसामान्य कुटुंबात जन्मलेल्या जनार्धन वाघमारे (बापू ) अल्पशिक्षीत होते पण मात्र शिक्षण घेतलेल्या तरुणाना सुद्धा लाजवेल असे कार्य बापू यांनी केले होते समाज कल्याण सभापती असताना जिल्यातील सर्व गोर गरीब जनतेला ज्या काही समाज कल्याण मार्फत योजना मिळत होत्या त्या प्रामाणिक पणे देण्याचे कार्य बापू यांनी केले होते .वाघमारे बापू हे राजकारणातील एक निस्कलक चेहरा आणि पार्दशक नेता म्हणुन त्यांची ख्याती होती . आणि एक जन सामान्याचा नेता म्हणुन या परिसरात बापू याच्याकडे पाहीले जात होते. त्यांनी नेहमीच आंबेडकरी चळवळी कार्यकर्ते याना नेहमीच बळ देण्याचे कार्य बापू यानी केले आहे बापू याच्या जाण्याने या परिसरात शोककळा पसरली आहे . त्याच्या पश्चात तीन मुले पत्नी सुना नातवंडे असा परिवार आहे त्याच्यावर उदया शुक्रवार दि . ५ डिसेंबर रोजी सलगरा येथील निर्वाण भुमीत त्याच्यावर अंतिम संस्कार होणार आहे .

# गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह योजना आता डिजिटल स्वरुपात

मुंबई,(प्रतिनिधी)– 'गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह योजने'चा लाभ आता महाडीबीटी पोर्टलमार्फत थेट ऑनलाईन मिळणार असून, शेतकऱ्यांना तात्काळ मदत पोहोचवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. शेतीत काम करताना होणाऱ्या अपघातांमुळे मृत्यू किंवा अपंगत्व आलेल्या शेतकऱ्यांना ही योजना महत्त्वाची ठरत असून, पूर्वी ऑफलाईन स्वीकारल्या जाणाऱ्या अर्जांची प्रक्रिया आता पूर्णपणे डिजिटल करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले.

शेतीत काम करताना विविध कारणांमुळे होणाऱ्या अपघातांमुळे शेतकऱ्यांचा मृत्यू किंवा अपंगत्वाच्या घटना राज्यात वारंवार घडतात. अशा घटनांमध्ये शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत मिळावी म्हणून राज्य सरकार १९ एप्रिल २०२३ पासून गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह योजना राबवत आहे. या योजनेत शेतकऱ्याचा अपघाती मृत्यू झाल्यास २ लाख रुपये तर एक डोळा किंवा एक अवयव कायमस्वरूपी निकामी झाल्यास १ लाख रुपयांची मदत दिली जाते.

पूर्वी या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकरी किंवा वारसदारांना तालुका कृषी अधिकारी कार्यालयात सविस्तर प्रस्ताव आणि आवश्यक कागदपत्रे सादर करावी लागत होती. कागदपत्रांतील त्रुटी, पूर्ततेतील विलंब यामुळे अनुदान देण्यास उशीर होत होता. यावर उपाय म्हणून राज्य शासनाने ही संपूर्ण अर्जप्रक्रिया महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन करण्याचा निर्णय घेतला आहे, असे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले.

ऑनलाईन अर्जप्रक्रियेमुळे अपघातग्रस्त शेतकरी किंवा त्यांचे वारसदार घराबाहेर न पडता, त्यांच्या वास्तव्याच्या ठिकाणावरूनच अर्ज भरू शकतील. अर्जाची सद्यस्थितीही महाडीबीटी पोर्टलवर पाहता येणार आहे. पोर्टलवर अर्ज भरल्यानंतर तो थेट कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांच्या लॉगिनवर जाईल. कागदपत्रांमध्ये त्रुटी असल्यास ती दुरुस्त करण्यासाठी संबंधित शेतकरी किंवा वारसदारांना मोबाईलवर एसएमएसद्वारे सूचना मिळणार आहेत. त्यामुळे शासकीय कार्यालयांच्या चकरा न मारता त्रुटी ऑनलाइनच दुरुस्त करता येतील.

तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडून प्रस्तावांची तपासणी करण्यात येईल आणि तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखालील समिती मंजुरी देईल. त्यानंतर मंजूर अनुदानाची रक्कम थेट डीबीटीद्वारे शेतकरी किंवा वारसदारांच्या बँक खात्यात जमा केली जाणार आहे. २०२५–२६ या वर्षाकरिता या योजनेसाठी १२० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, ४३५९ शेतकरी प्रस्तावांना ८८.१९ कोटी रुपये त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले आहेत. महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने योजना राबविल्यामुळे प्रक्रिया अधिक वेगवान, पारदर्शक आणि शेतकरी केंद्रित होणार असल्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी स्पष्ट केले.

# वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या 'सेवाखंड क्षमापित' करण्याच्या ऐतिहासिक निर्णयामुळे आरोग्य सेवेत गुणात्मक वाढ होणार



मुंबई, दि. ०४ : राज्यातील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या पूर्वीच्या अस्थायी सेवाकाळातील 'सेवाखंड कालावधी क्षमापित' करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या ऐतिहासिक आणि महत्त्वपूर्ण निर्णयामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न मार्गी लागला आहे. निर्णयामुळे आरोग्य व्यवस्थेत निश्चितच गुणात्मक सुधारणा होईल, असे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी म्हटले.

निर्णयाचा थेट लाभ १५० वैद्यकीय अधिकाऱ्यांना मिळणार असून त्यांना विविध आर्थिक व प्रशासकीय लाभ प्राप्त होणार आहेत. आरोग्य भवन, मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात आरोग्यमंत्र्यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात 'सेवाखंड क्षमापित' पत्रांचे वितरण करण्यात आले.

राज्यात सार्वजनिक आरोग्य विभागात २००९ पूर्वी मोठ्या प्रमाणात वैद्यकीय अधिकारी अस्थायी स्वरूपात सेवेत होते. वर्ष २००९ मध्ये त्यांचा शासकीय सेवेत समावेश झाला; मात्र 'सेवाखंड कालावधी क्षमापित' न झाल्याने अनेक लाभांपासून ते वंचित राहिले होते. आता या निर्णयामुळे शेकडो वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सलग सेवेला मान्यता मिळणार आहे. सर्व प्रक्रिया पारदर्शकपणे पूर्ण करून पात्र अधिकाऱ्यांना पत्रे प्रदान करण्यात आली आहेत.

संबंधित पात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून उर्वरित पात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनाही या निर्णयाचे पत्र देण्यात येणार असल्याचेही मंत्री आंबिटकर त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी मंत्री श्री. आबिटकर म्हणाले, शासकीय आरोग्य सेवेतील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सेवा अधिक परिणामकारकपणे द्यावी. नागरिकांनी खाजगी रुग्णालयांऐवजी सरकारी रुग्णालयांवर विश्वास ठेवावा, अशी अपेक्षा आहे. नक्षलग्रस्त, डोंगरी व आदिवासी भागात कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकारी–कर्मचाऱ्यांना वेतनासह विशेष प्रोत्साहनपर अनुदान देण्यासाठीही वित्त विभागाकडे प्रस्ताव पाठविला आहे.

तसेच अत्याधुनिक शस्त्रक्रिया, विशेष उपचार व तज्ज्ञ डॉक्टरांची उपलब्धता वाढावी यासाठी शासकीय रुग्णालयांना विशेष इन्सेंटिव्ह फंड देण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचेही त्यांनी सांगितले. यामुळे रुग्णालयांना आधुनिक सुविधा उपलब्ध होतील आणि सेवा गुणवत्तेत वाढ होईल.

महात्मा फुले जन आरोग्य योजना अंतर्गत उपचारासाठी मान्य आजारांची संख्या वाढवून ती २३९९ करण्यात आली आहे. वैद्यकीय सेवेतील सर्वांनी समर्पण भावनेने काम करावे, असे मंत्री श्री. आबिटकर यांनी सांगितले.

याप्रसंगी आरोग्य भवन, मुंबई येथे पात्र १५० वैद्यकीय अधिकाऱ्यांना 'सेवाखंड क्षमापित' पत्रांचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाला आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# १ एप्रिल २०१९ पूर्वीची वाहने एच.एस.आर.पी बसविण्यासाठी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ

धाराशिव दि.४ डिसेंबर (जिमाका ) केंद्रीय मोटार वाहन नियम,१९८९ च्या कलम ५० नुसार सर्व वाहनांवर हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट (क्ष्ठझ) बसविण्याची तरतूद आहे. सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.१३०२९/१९८५ (एम.सी.मेहता विरुद्ध केंद्र शासन) मध्ये दिलेल्या निर्देशानुसार १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणीकृत सर्व वाहनांना क्ष्ठझ बसविणे अनिवार्य करण्यात आले आहे.याबाबतचा आढावा रस्ते व महामार्ग मंत्रालय,नवी दिल्ली यांच्याकडून घेतला जात आहे.

तसेच,रस्ते व महामार्ग मंत्रालयाच्या ऋ.ड.ठ ११६२(ए) दि.४/१२/२०१८ व एस.ओ ६०५२ दि.६ डिसेंबर २०१८ नुसार ६ डिसेंबर २०१८ पासून नोंदणी होणाऱ्या सर्व नवीन वाहनांवर क्ष्ठझ बसविणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने जिल्ह्यातील सर्व वाहनधारकांना कळविण्यात येते की,१ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या वाहनांना क्ष्ठझ बसविण्यासाठी अंतिम मुदत ३१ डिसेंबर २०२५ अशी देण्यात आलेली आहे.वाहनधारकांनी मुदत संपण्यापूर्वी स्वतःच्या वाहनांवर क्ष्ठझ अनिवार्यपणे बसवून घ्यावी,असे आवाहन करण्यात येत आहे.

३१ डिसेंबर २०२५ नंतर क्ष्ठझ नसलेल्या वाहनांवर मोटार वाहन कायदा,१९८८ नुसार कारवाई करण्यात येणार आहे.तथापि,३१ डिसेंबर २०२५ पर्यंत क्ष्ठझ बसविण्यासाठी घेतलेली अपॉइंटमेंट असल्यास अशा वाहनांवर कोणतीही कारवाई केली जाणार नाही, याची नोंद घ्यावी. असे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी हर्षल डाके यांनी कळविले आहे.


## लातूर समाचार धाराशिव

बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क

9422472502
9175325708


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२–२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२–२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२–२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२–२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२–२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२–२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२–२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२–२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२–२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२–२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२–२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२–२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२–२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१–२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२–२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२–२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२–२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२–२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२–२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२–२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649